म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय कादंबरी
दा. क्र. ११९८

जगद्गुरु

सुरेश शर्मा

BVBK 0401118
BVBK-0401118

# जगद्गुरु

(स चि त्र)

ना. वा.
नों. क्र. ११९८

म. ग्रं. सं. ग्रं.
... ...
क्र. ११२६
विषय....किशोर
६९५.

सुरेश शर्मा

BVBK-0401118
BVBK-0401118

रम्यकथा प्रकाशन, पुणें-३०

मूल्य : २॥ रुपये

प्रकाशक :

वा. ग. मेहेंदळे,
रम्यकथा प्रकाशन,
३९२ नारायण पेठ,
कान्हेरे बिल्डिंग, पुणें–३०.

प्रथमावृत्ति : मार्च १९७६

पुनर्मुद्रणाचे सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :
वा. ग. मेहेंदळे,
जयभारत मुद्रणालय
५५१ बुधवार पेठ, पुणें २

# स म र्प ण

आधीं तें करावें कर्म, कर्ममार्गें उपासना ।
उपासकां सांपडे ज्ञान, ज्ञानें मोक्षचि पावणें ।।
या गीतातत्वाला अनुसरून
सो ऽ हंसाधना करतां करतांच
' निजधामीं ' गेलेले ज्ञानयोगी

**स्वामी स्वरूपानंद**

यांच्या

नैनं छिन्दति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ।।
अशा अमर आत्म्याला
सविनय समर्पण.

स्वामींच्या पायांचा पाईक,

सुरेश शर्मा

# जगद्गुरु

## एक

दक्षिण भारतांत केरळ नांवाचा एक प्रांत आहे. मसाल्यांच्या जिन्नसांचें अर्थात् मिऱ्यें, लवंगा, वेलदोडे, दालचिनी, जायफळें वगैरे जिन्नसांचें पीक त्या प्रांतांत भरपूर येतें,. म्हणून केरळला मसाल्यांचा प्रांत असें म्हणतात.

त्या प्रांतांतील कालाडी नांवाच्या गांवांत एक श्रीमंत ब्राह्मण कुटुंब रहात होतें. त्या कुटुंबांतल्या कर्त्या पुरुषाचें नांव शिवगुरु असें होतें नि त्याच्या बायकोचें नांव विशिष्टा असें होतें.

कुटुंबांत इतर सारीं सांपत्तिक सुखें होतीं. असें असलें, तरीहि त्या कुटुंबांत एकच दुःख होतें. त्या कुटुंबांत वंशाचा दिवा नसल्या-मुळें पति पत्नी नेहमीं दुःखी असत.

एके दिवशीं विशिष्टा आपल्या नवऱ्याला म्हणाली, 'माझ्या मनांत एक विचार आला आहे. तुम्हीं ऐकून घेत असाल तरच मी तो तुम्हांला सांगेन.'

शिवगुरु अधीरतेनें म्हणाला, 'सांग, काय म्हणणें आहे तुझें?'

‘ आमच्या गांवापासून थोडा दूर का होईना, वृष पर्वत आहे ना ? तिथें आपण दोघेंहि जाऊं. ’

‘ तिथें जाऊन काय करायचें ?’ शिवगुरूनें विचारलें.

‘ कांहीं दिवस कंदमुळें भक्षण करून शंकराची पूजाअर्चा करूं. तो जटाजूटधारी चंद्रमौलि आमच्यावर प्रसन्न होईल असा मला विश्वास वाटतो. आपण त्याच्याकडे मुलगा मागूं. ’

शिवगुरु हाहि शिवभक्तच होता. बायकोचें बोलणें त्याच्या लक्षांत आलें नि तें त्याला पटलें.

दुसऱ्या दिवशीं तो आपल्या पत्नीसह वृष पर्वतावर जाऊन पोहोंचला नि त्यानंतर तीं दोघेंहि शंकराच्या पूजेअर्चेंत आपापल्या काया कष्टवूं लागलीं.

हळूहळू एक वर्ष निघून गेलें.

एके दिवशीं रात्रीं शिवगुरूला शंकरानें स्वप्नांत दर्शन दिलें. तो प्रेमळ शब्दांत शिवगुरूला म्हणाला, ‘ बेटा, तुझ्या भक्तीमुळें मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहें ! तुझी काय इच्छा आहे ? मी ती पुरी करीन. ’

देव प्रसन्न झाल्यामुळें शिवगुरूच्या नेत्रांत आनंदाश्रु आले ! त्याचा कंठ दाटून आला; पण तो मोठ्या कष्टानें म्हणाला, ‘ देवा, मला सर्वज्ञ असा पुत्र द्या. ’

शंकर म्हणाला, ‘ मी तुला तसा पुत्र देईन; पण तो अल्पायुषी असेल. ’

त्यावर शिवगुरु नम्रपणें म्हणाला, ‘ प्रभो, आपण विश्वाचे स्वामी आहांत, म्हणूनच आपल्याला लोक विश्वनाथ असें म्हणतात. मी आपलें सांगणें कसें झिडकारूं ? आयुष्य घटविणें किंवा वाढविणें ही गोष्ट आपल्या आधीन आहे. ’

शंकर म्हणाला, 'तर मग ठीक आहे. तुझी इच्छा पुरी होईल. मी स्वतःच तुझ्या घरीं पुत्ररूपानें जन्माला येईन. आतां ही तपस्या थांबव नि पत्नीसह आपल्या घरीं जा.'

असें म्हणून शंकर अंतर्धान पावला.

शिवगुरु पत्नीसह आपल्या घरीं परत आला.

त्यानंतर तो पवित्र मनानें रोज शंकराची पूजाअर्चा करूं लागला.

एक वर्षानंतर विशिष्टेनें एका पुत्ररत्नाला जन्म दिला!

शिवगुरूचा आनंद गगनांत मावेनासा झाला. वार्धक्यावस्थेंत त्याला पुत्रमुख पहायला मिळालें, म्हणून त्यानें मोठ्या थाटामाटांत पुत्रजन्मोत्सव साजरा केला. निर्धन माणसांना गाई, धन, भूमि इत्यादिकांचीं दानें दिलीं. शंकराच्या कृपेमुळें आपल्याला पुत्रलाभ झाला असें त्याला वाटल्यामुळें त्यानें मुलाचें नांव 'शंकर' असें ठेवलें.

शंकर बालपणींच शांत, गंभीर नि बुद्धिमान असा होता. शिवगुरु त्याचे फार लाड करीत असे. विशिष्टेचेंहि त्याच्यावर प्राणापलीकडे प्रेम होतें. तो जरासा नजरेआड झाला, तर ती अस्वस्थ होत असे.

एके दिवशीं शिवगुरु उपनिषदें वाचीत होता. जवळच शंकर बसला होता. त्यावेळी तो केवळ तीन वर्षांचा बालक होता.

शंकरानें शिवगुरूला सहजच विचारलें, 'बाबा, या ग्रंथाचें नांव उपनिषदें असें आहे ना?'

'होय बाळा!' शिवगुरूनें आश्चर्यचकित होऊन शंकराकडे पाहिलें नि त्याला विचारलें, 'हीं उपनिषदें आहेत हें तुला कसें कळलें?'

शंकर हंसत हंसत म्हणाला, 'बाबा, मी सध्यां उपनिषदें वाचतों आहें असें काल तुम्ही आईकडे बोललां होतां. आत्तांच तुम्ही जे श्लोक वाचलेत, ते लक्षांत आहेत माझ्या!'

'खरेंच का?'

'होय बाबा.'

शिवगुरु हंसला नि त्यानें शंकराला विचारलें, 'खोटें बोलायला कधींपासून शिकलास?'

'नाहीं बाबा, मी खरें तेंच बोलतों आहें.'

असें म्हणून तो उपनिषदांतले श्लोक न चुकतां म्हणूं लागला.

आतां मात्र शिवगुरूच्या आश्चर्याला पारावार राहिला नाहीं! तो मनांत म्हणाला, 'तीन वर्षांचा बालक इतका बुद्धिमान असणें शक्य तरी आहे का? खात्रीनें हा मुलगा असामान्य असला पाहिजे अन् म्हणूनच यानें एकदां ऐकलेले श्लोक बिनचूक म्हणून दाखविले!'

शिवगुरूनें ती गोष्ट लपवून ठेवली नाहीं. त्यानें लगेच आपल्या बायकोला हांक मारली.

शंकरानें तेच श्लोक पुन्हां आपल्या आईला बिनचूक म्हणून दाखविले! विशिष्टेनें त्याला आपल्या कुशींत ओढलें नि ती म्हणाली, 'माझा शंकर आशुतोषाचा अवतार आहे!'

असेच आणखीन् कित्येक दिवस गेले. त्या अवधींत शंकरानें आपल्या आईच्या तोंडून रामायण, महाभारत नि पुराणें यांच्यांतील ऐकलेले कांहीं श्लोक कंठस्थ केले! सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे शंकर हा श्रुतिधर होता. तो जें कांहीं ऐके, त्याची त्याला आठवण रहात असे. ऐकलेलें तो कधींच विसरत नसे!

शंकराची अलौकिक बुद्धि पाहिल्यावर शिवगुरु फारच खूष झाला. शंकराला पांच वर्षें पुरीं झाल्यावर अभ्यासासाठीं गुरुगृहीं पाठवायचें असें त्यानें ठरविलें; तथापि त्याची ती इच्छा पुरी झाली नाहीं ! शंकराला चौथें वर्ष लागल्यावर शिवगुरूला यमराजाकडून बोलावणें आल्यामुळें त्याला त्याच्या आईच्या कुशींत सोडून तो स्वर्गलोकीं निघून गेला !

विशिष्टा विधवा झाली ! तिनें रडून रडून आकांत केला; पण आतां तिचें दुःख दूर करणारा तिथें कोण होता ? तिनें आपल्या नवऱ्याचे अंत्यसंस्कार केले नि शंकराला बरोबर घेऊन ती आपल्या माहेरीं निघून गेली !

# दोन

शंकराला आतां पांच वर्षें पुरीं झालीं होतीं.

विशिष्टा आपल्या एकुलत्या एका जिवाच्या कलिजाला घेऊन कालाडी येथील आपल्या घरीं परत आली नि तिथें त्याचा व्रतबंध केल्यावर त्याला शिक्षणासाठीं गुरुगृहीं पाठवून दिलें.

शंकराची प्रतिभा नि अभ्यासांतील आस्था पाहिल्यावर त्याचे गुरु खूष झाले. पांच वर्षें वयाच्या शंकरानें गीर्वाण भाषेंतील शुद्ध उच्चारणामुळें गुरुजी नि त्याचे सहपाठी यांना आश्चर्यचकित केलें. गुरुजी शंकराला जो जो धडा शिकवीत असत, तो तो धडा तो विनचूक म्हणून दाखवी. त्याच्या सहपाठ्यांना शिकविलेले श्लोकहि तो ऐकून शिकत असे.

थोड्याच दिवसांत शंकरावर त्याच्या गुरुजींची मर्जी बसली. त्यानें दोन वर्षांच्या अवधींत इतिहास, पुराणें, न्यायशास्त्र इत्यादि ग्रंथांचा अभ्यास पूर्ण केला.

एके दिवशीं शंकराचे गुरुजी त्याला म्हणाले, ' बाळ शंकर,

जो विद्यार्थी न्यायशास्त्राचा अभ्यास करतो, त्याला भिक्षाटन करावें लागतें असा आमचा नियम आहे. तूंहि रोज भिक्षा मागून आण.'

शंकर विचारांत पडला. तो मनांत म्हणाला, 'मी आजपर्यंत कुणाकडे कधीं हात पसरला नाहीं. अशा स्थितींत आज मला भिक्षा मागता येईल का ?' पण गुरुजींची आज्ञा त्यानें कशी मोडायची ?

त्यानें कांहीं न बोलतां भिक्षापात्र उचललें नि ... बाहेर पडला.

तितक्यांत गुरुजींनीं त्याला थांबविलें नि ते त्याला म्हणाले, 'तथापि भिक्षा मागण्यापूर्वी एक गोष्ट लक्षांत ठेव. रोज ... या घरीं तिला एकाच घरीं भिक्षा माग; पण तिथून भिक्षा न घेतां परत येऊं नकोस.'

'आज्ञा गुरुजी.' असें म्हणून शंकर पुढें चालूं लागला.

चालतां चालतां तो एका ब्राह्मणाच्या घरापाशीं येऊन थांबला. तें घर बाहेरून फार सुंदर दिसत होतें, म्हणून तें कुणातरी श्रीमंताचें असलें पाहिजे असें त्याला वाटलें. त्यावेळीं त्या घराचा पुढील दरवाजा बंद होता, म्हणून तो दरवाजापाशीं गेला नि त्यानें दरवाजाची कडी खटखटावली.

आवाज ऐकल्याबरोबर घरांतल्या ब्राह्मण पत्नीनें दरवाजा उघडला नि समोर पांच वर्षांच्या मुलाला पहातांच ती थक्क होऊन जागच्याजागींच उभी राहिली.

शंकरानें खड्या स्वरांत तिला म्हटलें, 'माते, ॐ भवति भिक्षां देहि.'

कां कुणास ठाऊक; पण त्यावेळीं त्या कुलस्त्रीच्या डोळ्यांतून घळघळां आंसवें ओघळूं लागलीं.

आपण निर्धनाच्या दारांत उभे आहों असें शंकराला वाटलें.

तो तिला म्हणाला, 'माते, तूं दु:खी कां ? तुझ्या घरांत जें कांहीं असेल, तें माझ्या भिक्षापात्रांत वाढ. मी भिक्षा घेतल्याखेरीज रिकाम्या हातानें परत जाणार नाहीं !'

ती ब्राह्मणी धर्मसंकटांत सांपडली ! इच्छा असली तरीहि देतां येण्यासारखें असें कांहींच नव्हतें तिच्यापाशीं ! घरांत एक दाणाहि शिल्लक नव्हता !

दोन



पण तितक्यांत तिला कांहींतरी आठवलें. ती घरांत गेली नि एक आवळा घेऊन आली. आणलेला आवळा शंकराच्या हातावर ठेवतां ठेवतां ती त्याला म्हणाली, 'घे बाळा, माझ्यापाशीं हा एकच आवळा आहे, तो गोड मानून घे !'

शंकराचें कोमल अंत:करण आंतल्या आंत रडूं लागलें !

शंकरानें तो आवळा घेतल्यावर त्या ब्राह्मणीसमोरच आपले डोळे मिटले नि त्यानें लक्ष्मीची प्रार्थना केली, 'हे देवी, तुझ्यांत

जर कांहीं सामर्थ्य असेल, तर या गरीब ब्राह्मणाच्या घरांत सोन्याचा वर्षाव कर !'

ती ब्राह्मणी मनांत म्हणाली, 'काय विलक्षण मुलगा आहे हा !'

त्या ब्राह्मणीला आशीर्वाद देऊन शंकर गुरुगृहीं परत आला नि त्यानें तो आवळा आपल्या गुरुजींच्या हातावर ठेवला. शंकराची गुरुभक्ति पाहून गुरुजी त्याच्यावर प्रसन्न झाले.

दुसऱ्या दिवशीं पहांटेला एक स्त्री त्या गुरुजींच्या घरीं आली. गुरुजींनीं आश्चर्यचकित होऊन तिच्याकडे पाहिलें नि तिला विचारलें, 'कुणाला शोधते आहेस मुली ?'

त्यावर ती स्त्री म्हणाली, 'काल शंकर नांवाचा एक मुलगा माझ्या घरीं भिक्षा मागण्यासाठीं आला होता; पण माझ्या घरीं अन्न नव्हतें, म्हणून मीं त्याच्या हातावर एक आवळा ठेवला. त्या अलौकिक मुलाला मी भेटणार आहें.'

शंकराच्या अंगीं असलेलें अलौकिक सामर्थ्य त्याच्या गुरुजींना माहीत होतें; तथापि कोणत्या तरी विशेष कारणासाठीं ती शंकराकडे आली असावी असें त्यांना वाटल्यामुळें त्यांनी तिला पुन्हां विचारलें, 'मुली, शंकराकडून कांहीं अपराध घडला आहे का ?'

'नाहीं गुरुजी.' ती स्त्री म्हणाली, 'पण आपला शिष्य शंकर हा ईश्वरी अवतार आहे अशी माझी खात्री पटली आहे. काल जेव्हां तो भिक्षेसाठीं माझ्या दारीं येऊन उभा राहिला, तेव्हां त्याला अन्न देतां येत नसल्यामुळें मला वाईट वाटलें. माझ्या घरांत फक्त एकच आवळा होता, तो मीं त्याच्या हातावर ठेवला; पण मी आज पहांटेला उठून पहातें तर माझ्या घरांत चोहोंकडे

सोन्याचे आवळे विखरून पडलें असल्याचें मला दिसलें. ते सारे आवळे त्या मुलाच्या आशीर्वादानेंच मला मिळाले आहेत असें मला वाटतें, म्हणून त्या अलौकिक बालकाला पुन्हां पहाण्यासाठीं मी इथें आलें आहें. कृपा करून आपण त्याला इथें बोलवा.'

गुरुजींनीं शंकराला हांक मारून बोलावलें.

शंकराला पहातांच त्या ब्राह्मणीनें त्याच्या पायांवर आपलें मस्तक ठेवलें नि ती त्याला म्हणाली, 'शंकर, आपण सर्वसामान्य बालकांसारखे नसून कुणीतरी अलौकिक पुरुष आहांत. आपल्या आशीर्वादानें माझें घर लक्ष्मीनें सोन्याच्या आवळ्यांनीं भरलें आहे. आपण माझ्यासोबत या. त्यांतले अर्धे आवळे आपल्याला देण्याची माझी इच्छा आहे.'

त्या ब्राह्मणीचें तें बोलणें ऐकतांच शंकरानें आपली मान खालीं घातली.

तेव्हां गुरुजींनीं शंकराला विचारलें, 'बाळ शंकर, या लक्ष्मीला तूं काय सांगतोस? कांही सांगायचें असेल तें स्पष्ट शब्दांत सांग तिला.'

शंकरानें आपली खालीं घातलेली मान वर उचलली अन् तो त्या ब्राह्मणीला म्हणाला, 'माते, प्राणी जन्माला येतांना तो सोबत फक्त शरीर घेऊन या धरतीवर जन्माला येत असतो. मीहि तसाच जन्माला आलों आहें. मला तुझे ते सोन्याचे आवळे नकोत. लक्ष्मीनें ते तुला दिले आहेत. त्यांचा तूं सुखानें उपभोग घे.'

ब्राह्मणीनें तिथेंच बसकण मारली अन् ती शंकराला म्हणाली, 'जोंपर्यंत तुम्ही माझ्यासोबत येणार नाहीं, तोंपर्यंत मी अन्नपाणी घेतल्याशिवाय इथेंच बसून रहाणार!'

शंकरानें आपल्या गुरुजींकडे पाहिलें. त्यांनीं त्याला आज्ञा केली, ‘ जा बाळ शंकर, या लक्ष्मीचा हट्ट पुरा कर. ’

गुरुजींच्या आज्ञेनुसार शंकर त्या ब्राह्मणीसोबत तिच्या घरीं गेला.

ब्राह्मणीला अतिशय आनंद झाला होता. थोड्या वेळापूर्वी तिनें ज्या खोलींत ते सोन्याचे आवळे सांठवून ठेवले होते, त्या खोलींत ती शंकराला घेऊन गेली.

चकाकत असलेला तो सोन्याच्या आवळ्यांचा ढीग पहातांच शंकर खरोखरच आश्चर्यचकित झाला !

त्यानंतर ती ब्राह्मणी त्याला म्हणाली, ‘ बस बाळा. या ढिगाचे मी दोन सारखे वांटे करतें. अर्धे आवळे तूं तुला घेऊन जा अन् अर्धे आवळे मला ठेवून दे. ’

त्यावर शंकर कांहींच बोलला नाहीं ! त्याच्या अंतःकरणांत अल्पहि अभिलाषा उत्पन्न झाली नव्हती. तो त्या सोन्याच्या आवळ्यांना शिवणारहि नव्हता; तथापि तो अगतिक बनला होता !—त्याच्या गुरुजींनीं त्याला आज्ञा केली होती !

त्या ब्राह्मणीनें अर्धे आवळे शंकराच्या पुढ्यांत ठेवले. शंकरानें हात लावतांच त्यांना मूळचें फलस्वरूप प्राप्त झालें !

तें पाहिल्यावर त्या ब्राह्मणीला मोठें नवल वाटलें अन् ती शंकराच्या तोंडाकडे पाहूं लागली !

शंकर तिला म्हणाला, ‘ माते, मी सोन्याचे आवळे घेणार नाहीं असें पूर्वींच तुला सांगितलें होतें; पण माझें सांगणें तुला पटलें नाहीं. देवानें मला हीं फळें दिलीं आहेत. सोन्याच्या फळांचें सुख तुझ्यासाठीं आहे. मी हीं फळें घेऊन जातों. ’

त्यावर ब्राह्मणी म्हणाली, ‘ तुझ्यासोबत मीहि येतें बाळा. ’

'माझ्यासोबत गुरुगृहीं येऊन तूं काय करणार ?' शंकरानें विचारलें.

'तूं केलेला हा चमत्कार मी तुझ्या गुरुजींना सांगणार आहें.' त्या ब्राह्मणीनें सांगितलें.

शंकर म्हणाला, 'तूं ज्याला चमत्कार समजते आहेस, ती देवाची कृपा आहे. द्रव्यलोभांत पडून विद्यार्जन सोडावें अशी देवाची इच्छा नाहीं, म्हणून माझ्या वांटयाचे सोन्याचे आवळे त्यानें मला सत्य स्वरूपांत दिले. तूं गुरुजींना जें कांहीं सांगणार म्हणतेस, तें मला सांग, मी तें त्यांना सांगेन.'

पण शंकराचें बोलणें तिनें ऐकलें नाहीं. ती त्याच्याबरोबर गुरुगृही गेली अन् घडलेला सारा प्रकार तिनें गुरुजींना सांगितला.

गुरुजींना आनंद झाला. त्यांनीं तिला आदरपूर्वक निरोप दिला.

शंकराच्या त्या अलौकिक सामर्थ्याची गोष्ट चोहोंकडे फैलावली !

◆ ◆

# तीन

तब्बल दोन वर्षें गुरुगृहीं राहून विद्याध्ययन केल्यानंतर शंकर आपल्या घरीं परत आला.

आतां त्याला सात वर्षें पुरीं झालीं होतीं; तथापि पंचवीस वर्षांच्या तेजस्वी तरुण ब्राह्मणाइतकी त्याची योग्यता होती.

आपला शंकर मेधावी आहे, सामर्थ्यसंपन्न आहे, तेव्हां आतां त्याचें लग्न लावून द्यायला हरकत नाहीं असा विशिष्टेनें विचार केला.

शेजारच्या एका सुस्वरूप कन्येशीं त्याचें लग्न लावून देण्याचें तिनें ठरविलें. इतकेंच नव्हे तर तिनें ती गोष्ट शंकरालाहि सांगितली.

गुरुकुलांतून घरीं परत आल्यावर मुलाचें लग्न लावून देण्याची प्रथा त्या काळीं केरळ प्रांतांत होती.

विवाहाची गोष्ट ऐकतांच शंकर म्हणाला, 'आई, मी विवाह करणार नाहीं !'

'माझ्यासोबत गुरुगृहीं येऊन तूं काय करणार?' शंकरानें विचारलें.

'तूं केलेला हा चमत्कार मी तुझ्या गुरुजींना सांगणार आहें.' त्या ब्राह्मणीनें सांगितलें.

शंकर म्हणाला, 'तूं ज्याला चमत्कार समजते आहेस, ती देवाची कृपा आहे. द्रव्यलोभांत पडून विद्यार्जन सोडावें अशी देवाची इच्छा नाहीं, म्हणून माझ्या वांटयाचे सोन्याचे आवळे त्यानें मला सत्य स्वरूपांत दिले. तूं गुरुजींना जें कांहीं सांगणार म्हणतेस, तें मला सांग, मी तें त्यांना सांगेन.'

पण शंकराचें बोलणें तिनें ऐकलें नाहीं. ती त्याच्याबरोबर गुरुगृही गेली अन् घडलेला सारा प्रकार तिनें गुरुजींना सांगितला.

गुरुजींना आनंद झाला. त्यांनीं तिला आदरपूर्वक निरोप दिला.

शंकराच्या त्या अलौकिक सामर्थ्याची गोष्ट चोहोंकडे फैलावली!

✦ ✦

# तीन

तब्बल दोन वर्षें गुरुगृहीं राहून विद्याध्ययन केल्यानंतर शंकर आपल्या घरीं परत आला.

आतां त्याला सात वर्षें पुरीं झालीं होतीं; तथापि पंचवीस वर्षांच्या तेजस्वी तरुण ब्राह्मणाइतकी त्याची योग्यता होती.

आपला शंकर मेधावी आहे, सामर्थ्यसंपन्न आहे, तेव्हां आतां त्याचें लग्न लावून द्यायला हरकत नाहीं असा विशिष्टेनें विचार केला.

शेजारच्या एका सुस्वरूप कन्येशीं त्याचें लग्न लावून देण्याचें तिनें ठरविलें. इतकेंच नव्हे तर तिनें ती गोष्ट शंकरालाहि सांगितली.

गुरुकुलांतून घरीं परत आल्यावर मुलाचें लग्न लावून देण्याचीं प्रथा त्या काळीं केरळ प्रांतांत होती.

विवाहाची गोष्ट ऐकतांच शंकर म्हणाला, ‘आई, मी विवाह करणार नाहीं !’

'कां ?' विशिष्टेनें विचारलें.

'सर्वज्ञ होण्याची माझी इच्छा आहे. तूं सर्वज्ञ हो असा बाबांनीं मला आपल्या अंतकाळीं आदेश दिला आहे. त्यांचा तो आदेश मी धुडकावून लावणार नाहीं.' शंकरानें सांगितलें.

विशिष्टेनें त्याची परोपरीनें समजूत घातली; पण शंकर बधला नाहीं !

अखेरीस विशिष्टेनें रडून आकांत केला नि ती स्वस्थ बसली.

शंकर घरीं बसूनच शास्त्रांचें अध्ययन करीत होता; तथापि तो आपल्या आईच्या सेवेकडे कधींच दुर्लक्ष करीत नव्हता. आपल्या आईला संतुष्ट राखण्यासाठीं तो नाना प्रकारचे प्रयत्न करीत असे.

आस्ते आस्ते शंकराच्या विद्वत्तेची ख्याति चोहोंकडे पसरली. बरेचसे विद्वान पंडितहि शास्त्रांचें अध्ययन करण्यासाठीं त्याच्याकडे येऊं लागले. त्याची शिकविण्याची हातोटी पाहून सारे आश्चर्यचकित होत-असत नि हा सात वर्षांचा मुलगा दैवी सामर्थ्यसंपन्न आहे असें ते समजत असत.

शंकराची आई रोज प्रातःकाळीं आलवाई नदींत स्नान करण्यासाठीं जात असे. वाटेंत देवमंदिर होतें. आंघोळ आटोपल्यावर ती त्या मंदिरांत जाई नि आपल्या कुलदेवतेची पूजा केल्यावर घरीं येई, त्यामुळें तिला घरीं येण्यास रोज उशीर होई.

आलवाई नदी ही केरळ प्रांतांतली 'गंगा' समजली जाते !

उन्हाळ्याचे दिवस होते. एके दिवशीं शंकराची आई रोजच्यासारखी आलवाई नदींत स्नान करण्यासाठीं पहांटेला

निघून गेली. नेहमीपेक्षां बराच उशीर झाला, तरी ती परत घरीं आली नसल्याचें पाहिल्यावर शंकराला आपल्या म्हाताऱ्या आई-बद्दल काळजी वाटूं लागली. तो मनांत म्हणाला, 'आईला इतका उशीर कधींच होत नाहीं. ज्याअर्थी तिला उशीर झाला, त्याअर्थी तसेंच कांहींतरी कारण असलें पाहिजे. काय प्रकार आहे तो पाहून येणें बरें.'

असें म्हणून तो घरांतून आलवाई नदीकडे जाण्यासाठीं बाहेर पडला. कांहीं अंतर चालून गेल्यावर आपली आई वाटेंत बेशुद्ध पडली असल्याचें त्यानें पाहिलें. त्याचें अंत:करण व्याकुळ झालें अन् तो आपल्या आईला शुद्धीवर आणण्याच्या प्रयत्नाला लागला.

कांहीं वेळानें विशिष्टा शुद्धीवर आली अन् समोर शंकराला पहातांच ती आश्चर्यचकित होऊन मनांत म्हणाली, 'हा सावली-सारखा नेहमीं माझ्यासोबत असतो कीं काय?'

तिनें शंकराला आपल्या छातीशीं धरलें अन् म्हणाली, 'बाळा, कडक उन्हामुळें मला भोंवळ आली अन् चालतां चालतां मी वाटेंतच बेशुद्ध होऊन पडलें!'

मातृभक्त शंकराचें कोवळें काळीज कळवळलें! त्याच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले! तो अधीर होऊन आपल्या आईला म्हणाला, 'आई, आलवांई नदी आपल्या घराशेजारून वहात जाईल असा उपाय नाहीं का कांहीं?'

शंकर कितीहि विद्वान झाला, तरी अखेरीस तो सात वर्षांचा भोळाभावडा मुलगा होता.

त्याचा भोळेपणा पाहून विशिष्टेला हंसूं आलें. ती त्याला म्हणाली, 'तूं देवाचा परमभक्त आहेस; मग तूं देवाला कां नाहीं

सांगत तसें? 'आलवाई नदी आमच्या घराशेजारीं आणायला त्याला कठीण आहे का?'

'होय आई, मी देवाची प्रार्थना करतों अन् आलवाई नदी आमच्या घराशेजारीं तो कसा आणीत नाहीं तें पहातों!'

असें म्हणून त्यानें आपले हात जोडले अन् तो परमेश्वराची मनोभावें प्रार्थना करूं लागला– 'प्रभो, तूं सर्वशक्तिमान आहेस, तुझ्या इच्छेसारखें सर्व कांहीं घडतें! माझ्या आईला होणारे कष्ट आतां माझ्यानें सहन करवत नाहींत. कृपा कर नि नदीचा प्रवाह आमच्या घराशेजारून वहात जाईल असें कर, म्हणजे माझ्या आईला स्नानासाठीं दूर जाण्याचा त्रास होणार नाहीं.'

आपल्या मुलाची ती प्रार्थना विशिष्टा लक्षपूर्वक ऐकूं लागली. ती मनांत म्हणाली, 'शंकर इतका विद्वान असतांहि अशा प्रकारची प्रार्थना कां करतो आहे? एवढी मोठी नदी आपलें पात्र बदलील का कधीं? अशक्य गोष्ट कधीं शक्य होणें संभवनीय नसतें.'

ती आपल्या मुलाला समजावून सांगूं लागली, 'बाळा, परमेश्वर आपल्या भक्तांचीं दुःखें दूर करतो ही गोष्ट खरी असली तरी एवढी मोठी नदी आमच्या घराशेजारीं आणतां येणें त्याला शक्य नाहीं!'

'कां नाहीं आणणार आई? जोंपर्यंत आलवाई आमच्या घराशेजारीं येणार नाहीं, तोंपर्यंत मी अन्नपाणी घेणार नाहीं!' शंकरानें आपला निर्धार प्रकट केला.

त्याची ती प्रतिज्ञा ऐकतांच विशिष्टा घाबरली. तिला आपल्या मुलाविषयीं काळजी वाटूं लागली. तिनें त्याला शास्त्रांतलीं वचनें सांगून त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला; पण

शंकराच्या प्रार्थनेंत खंड पडला नाहीं ! तो सतत देवाची प्रार्थना करीत होता !

दयाळु देवाला आपल्या भक्ताची प्रार्थना ऐकूं येतेच येते. त्याला शंकराचीहि प्रार्थना ऐकूं आली !

आठ दिवसांनंतर मुसळधार पाऊस पडूं लागला ! रात्रंदिवस पडूं लागलेल्या पावसामुळें आलवाई नदीला महापूर आला अन् ती आपलें पात्र बदलून शंकराच्या घराशेजारून वाहूं लागली ! शंकरानें पुन्हां अन्नपाणी घेण्यास सुरवात केली !

शंकराच्या आईला असीम आनंद झाला ! ती आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना सांगूं लागली, 'पहा, माझ्या शंकराच्या प्रार्थनेमुळें देवानें आलवाई नदी माझ्या घराशेजारीं आणली !'

शंकराची ईश्वरनिष्ठा त्याच्या शेजाऱ्यांपाजाऱ्यांना पूर्वींच ठाऊक होती; इतकेंच नव्हे, तर आजूबाजूच्या गांवांतील लोकांनाहि ती ठाऊक होती अन् आतां तर प्रत्यक्ष प्रत्यंतरच आलें होतें, मग काय विचारतां ? सारे लोक त्याचे भक्त बनले अन् लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्याच्या दर्शनासाठीं येऊं लागल्या !

शंकराच्या घराला यात्रेचें स्वरूप आलें !

म्हणतां म्हणतां ती गोष्ट केरळचा राजा राजशेखर याच्या कानीं पडली. राजा विस्मित झाला. तो स्वतःच ईश्वरभक्त नि शास्त्रज्ञानी होता. त्याच्या दरबारांत विद्वान् लोकांचा सत्कार होत असे.

सात वर्षें वयाच्या बालकांत दैवी सामर्थ्य असल्याचें ऐकल्यावर त्या बालकाला आपण प्रत्यक्ष पहावें असें राजशेखराला वाटलें.

त्यानें आपल्या मुख्य मंत्र्यापाशीं एक हत्ती दिला नि त्याला सांगितलें, 'हा हत्ती शंकराला उपहारादाखल देऊन या.'

राजाचें म्हणणें मंत्र्याच्या लक्षांत आलें. तो हत्तीवर बसून शंकराच्या घरापाशीं आला नि दारांत येऊन उतरला. महाराज राजशेखरांचा हत्ती शंकराला राजवाड्यांत नेण्यासाठीं आला आहे अशी बातमी साऱ्या गांवांत पसरली. गांवांतले लोक शंकराच्या घरापाशीं जमूं लागले !

प्रधानानें शंकराला बाहेर बोलावलें नि त्याला सांगितलें, 'आमच्या महाराजांनीं तुमच्या सन्मानासाठीं हा हत्ती पाठविला आहे.'

उत्तरादाखल शंकर म्हणाला, 'मंत्रीमहाशय, माझी उपजीविका भिक्षान्नावर अवलंबून असते. वेदांचें अध्ययन–अध्यापन अन् गुरूची सेवा हें माझें व्रत आहे. या हत्तीशीं मला काय कर्तव्य ? धनाची लांच देऊन ब्राह्मणाचा धर्म नष्ट करणें हें खऱ्या राजाचें कर्तव्य नव्हे असें तुम्ही महाराजांना जाऊन सांगा. मी या हत्तीवर बसून राजमहालांत येणार नाहीं.'


प्रधान परत गेला नि शंकराचा निरोप त्यानें जशाचा तसा राजाला सांगितला.

राजाच्या चेहऱ्यावर रागाची लहानशी छटा उमटली; पण ती लगेच नष्ट झाली !

दुसऱ्या दिवशीं तो आपले मंत्री नि अंगरक्षक यांच्या समवेत कालाडी गांवांत आला. त्यानें तिथल्या एका बागेंत आपला मुक्काम केला. त्याच्या मनांत असतें, तर त्यानें शंकराला आपल्या शिबिरांत बोलावलें असतें; पण त्यानें तसें केलें नाहीं. तो स्वतःच शंकराच्या घरीं गेला.

त्यावेळीं शंकरानें मृगचर्म पांघरलें होतें. कमरेंत मुंजाची मेखला होती नि गळ्यांत शुभ्र वर्णाचें यज्ञोपवीत होतें. त्याग नि

तपस्या यांचें तेज त्याच्या चेहऱ्यावर झळकत होतें. राजानें तें पहातांच शंकर हा कैलासनाथ शंकराचा अवतार आहे असें त्याला वाटलें. तो त्याच्याकडे टक लावून पहात राहिला.



राजाचें स्वागत करण्याच्या मिषानें शंकर त्याला म्हणाला, 'महाराज, माझ्या घराला आज आपले पाय लागल्यामुळें मला अतिशय आनंद झाला आहे.'

त्यावर राजा म्हणाला, 'शंकरजी, आपण केवळ सात वर्षांचे बालक नसून ज्ञानाचे सागर आहांत. मी आपली परीक्षा पहाण्यासाठीं आलों होतों; पण आपल्या चेहऱ्यावरचें सूर्यासारखें तेज पाहिल्यावर सारें कांहीं विसरून गेलों. आपण खरोखरच दैवी सामर्थ्यानें संपन्न आहांत. कांहीं दिवस या गांवांत वास्तव्य करून आपल्या सत्संगाचा लाभ द्यावा अशी माझी इच्छा आहे.'

शंकरानें राजाचें म्हणणें मान्य केलें.

राजानें शंकराच्या घरीं सत्संगाची तयारी करविली.

दूरदूरचे लोक त्या सत्संगाचा लाभ घेण्यासाठीं शंकराच्या घरीं येऊं लागले.

शंकर रोज एकेका वेदवचनावर विद्वत्तापूर्ण भाष्य करीत असे नि श्रोत्यांकडून शाबासकी मिळवीत असे.

अशा प्रकारें कांहीं दिवस लोटल्यावर राजानें कांहीं स्वर्णमुद्रा शंकराच्या पुढ्यांत ठेवल्या अन् तो त्याला म्हणाला, 'मी बरेच दिवस आपल्या सहवासांत राहून आपल्या प्रवचनांचा लाभ घेतला असल्यानें आपण या स्वर्णमुद्रांचा स्वीकार करावा अशी माझी इच्छा आहे.'

राजाचें तें बोलणें ऐकतांच शंकर स्पष्ट शब्दांत त्याला म्हणाला, 'महाराज, मी ब्राह्मण नि ब्रह्मचारी आहें. स्वर्णमुद्रा स्वीकारून मी काय करूं? मातेच्या सेवेंत माझें तनमन वेंचणें एवढेंच मला ठाऊक. आपल्या दयेनें मला कोणत्याहि वस्तूची उणीव नाहीं!'

शंकराचा त्याग पाहून राजा स्तंभित झाला नि हात जोडून त्याला म्हणाला, 'पूजनीय शंकरजी, आपण बोलूं नका असें. मी धन्य झालों; तथापि दक्षणेदाखल ज्या स्वर्णमुद्रा मी आपल्याला देऊन चुकलों, त्या मला परत घेतां येणार नाहींत. आपण त्या योग्य व्यक्तींना वांटून टाका.'

त्यावर शंकर म्हणाला, 'महाराज, आपण राजा आहांत. आपल्या दरबारांत सर्व प्रकारचीं माणसें येत असतात. लायक व्यक्तीचा शोध आपल्याला सहजरीत्या घेतां येईल. विद्यादान हा माझा धर्म असून द्रव्यदान हें राजकार्य आहे. आपण हें द्रव्य योग्य व्यक्तींना वांटून द्या.'

शंकराचें तें स्पष्ट बोलणें ऐकल्यावर राजानें त्याच्यापुढें आपलें मस्तक नमविलें अन् त्यानें त्या स्वर्णमुद्रा लायक अशा ब्राह्मणांना वांटून टाकण्याविषयीं आपल्या प्रधानाला आज्ञा केली.

# चार

केरळांतला कीर्तिसौरभ उत्तर भारतांत पसरला अन् त्या शीतल मंद सुगंधाच्या स्पर्शानें उत्तर भारतांतील विद्वानांचा थकवा दूर होऊं लागला. केरळांत सात वर्षांचा एक अलौकिक बालक असल्याचें त्यांना कळलें नि ते त्याच्या दर्शनासाठीं दक्षिण भारतांत जाऊं लागले.

एके दिवशीं कांहीं ब्राह्मण शंकराच्या घरीं आले. विशिष्टेनें त्यांचा योग्य तो आदरसत्कार केला नि त्यांनीं विचारल्यावरून तिनें त्यांना शंकराचें जन्मटिपण दाखविलें. त्यांनीं तें जन्मटिपण पाहिलें नि आपले डोळे मिटले !

विशिष्टेनें विचारलें, ‘ माझ्या मुलाच्या जन्मकुंडलींत कांहीं विशेष योग आहे का ?’

तेव्हां एक ब्राह्मण म्हणाला, ‘ होय माते ! तुझ्या मुलाला आठवें वर्ष लागल्यावर तो स्वर्गवासी होणार !’

विशिष्टेवर वज्राघात झाला ! ती म्हणाली, ‘ तर मग

माझ्या संसाराचें वैराण वाळवंट होणार ! शंकराच्या आधारा-वरच मी जिवंत राहिलें आहें अन् तो जर स्वर्गवासी झाला, तर मी जगणार कशी,?'

तिचा तो प्रश्न ऐकतांच दुसरा ब्राह्मण म्हणाला, 'नाहीं माते ! तो आठव्या वर्षी साधु होणार असें त्याची जन्मकुंडली सांगत आहे !'

विशिष्टा अवाक् बनली ! तिला कांहींच कळेनासें झालें ! ती मनांत म्हणाली, 'शंकर आज सात वर्षांचा आहे. आठव्या वर्षी त्याला मृत्युयोग आहे, तर मग तो साधु कोणत्या वर्षी होणार ? छे ! हें सारें खोटें आहे !'

ती त्या ब्राह्मणांना म्हणाली, 'तुम्हांला जन्मकुंडली नीट पहातां येत नाहीं. तुम्ही मला घोटाळ्यांत पाडूं पहाताहांत. द्या ती जन्मकुंडली इकडे. मी ती दुसऱ्या कोणत्यातरी ज्योतिष्याला दाखवीन !'

विशिष्टेनें जन्मकुंडली घेतली नि ती घरांत गेली.

त्या ब्राह्मणांनींहि आपला रस्ता सुधारला !

त्या ब्राह्मणांचें बोलणें शंकर आडून ऐकत होता. तो मनांत विचार करूं लागला, 'किती चांगली गोष्ट सांगितली त्या ब्राह्म-णांनीं ! संन्यासाशिवाय आत्मज्ञान होत नाहीं अन् आत्मज्ञाना-शिवाय मोक्ष मिळत नाहीं, अर्थात् मोक्ष मिळविण्यासाठीं मीं संन्यास घेतलाच पाहिजे !'

तथापि संन्यास कसा घ्यायचा हा एकच प्रश्न होता !

दिवसेंदिवस त्याच्या मनांत संन्यासग्रहणाची इच्छा वाढू लागली !

एके दिवशीं संधि साधून तो आपल्या आईला म्हणाला' आई, मला संन्यासी व्हायचें आहे !'

त्याचें तें बोलणें ऐकतांच विशिष्टा विचलित होऊन रडूं ागली !

तिच्या नजरेसमोर ते दोघे ब्राह्मण ज्योतिषी उभे राहिले ान् ' शंकर खात्रीनें संन्यासी होणार...त्याला कुणीहि अडविणार ाहीं...त्याला आतां आठवें वर्ष लागणार आहे'-असें आपल्याला ी सांगत आहेत असा तिला भास होऊं लागला !

तिनें धांवत जाऊन शंकराला आपल्या छातीशीं धरलें अन् ी त्याला म्हणाली, ' बाळा, असें अभद्र बोलूं नकोस कांहीं ! अजून तूं लहान आहेस. मी मेल्यावर तूं खुशाल संन्यास घे. तुझ्या-वांचून हा संसार मला नरकांत लोटील ! मी जिवंत असेपर्यंत ुला संन्यासी होऊं देणार नाहीं !'

शंकराच्या डोळ्यांतून गंगा यमुना वाहूं लागल्या ! तो आपल्या आईला म्हणाला, ' आई, मला संन्यास घेण्याची परवा-नगी तुला द्यायची नसेल तर नकोस देऊं. मी त्या बाबतींत परमे-श्वराकडे बोलेन. माझी प्रार्थना तो अवश्य ऐकेल !'

दिवस निघून जात होते. जेव्हां शंकर आपल्या आईपाशीं संन्यास घेण्याबद्दलची गोष्ट काढी, तेव्हां ती रडत रडत त्याला सांगे, ' माझ्या देहांत प्राण असेस्तोंवर मी तुला संन्यास घेण्याची परवानगी देणार नाहीं !'

पण शंकराच्या अंतःकरणांत संन्यास घेण्याबद्दलची आतुरता दिवसेंदिवस वळावत चालली होती. तो कधींकधीं एकांतांत जाऊन बसे अन् देवाची प्रार्थना करी, ' देवा, मला सामर्थ्य दे ! ज्ञानाच्या प्रचारासाठीं तूं मला हा देह दिला आहेस; तथापि तें ज्ञान संन्यासा-

विना अपुरें असतें. असें असलें, तरी माझी आई दु:खी व्हावी असेंहि मला वाटत नाहीं...'

अशा रीतीनें कित्येक दिवस पार पडले.

एके दिवशीं पहांटेला शंकर आपल्या आईबरोबर सरितास्नान करण्यासाठीं गेला. त्यावेळीं त्या नदींत आणखीनहि कांहीं लोक स्नान करीत होते. शंकराची आई आंघोळ आटोपून बाहेर आली, तरी शंकर मात्र नदींत आंघोळ करीतच होता. इतक्यांत एका मगरीनें त्याचा पाय पकडला, त्याबरोबर तो ओरडला, 'आई, आई, वांचव मला ! मगरीनें माझा पाय पकडला आहे !'



विशिष्टेनें ती हांक ऐकतांच आपल्या मुलाला वांचविण्यासाठीं लगेच पाण्यांत उडी घातली ! जवळपास आंघोळ करीत असलेल्या लोकांनींहि शंकराच्या हाताला धरून त्याला नदीकांठीं ओढीत आणण्याचा प्रयत्न केला; तथापि ती मगर त्याला खोल पाण्यांत खेंचीत नेऊं लागली !

त्यावेळीं शंकरहि आपल्या प्राणरक्षणासाठीं त्या मगरीशीं झुंजत होता ! जेव्हां तो फारच थकून गेला, तेव्हां तो आपल्या आईला म्हणाला, ' आई, मला मगर खोल पाण्यांत खेंचून नेत आहे. माझा अंतकाळ आतां जवळ आला आहे, त्यासाठीं मी मनांतल्या मनांत आतुर संन्यासाचा संकल्प करून प्राण सोडतों, म्हणजे मला मुक्ति मिळेल !'

शंकराचें बोलणें ऐकतांच त्याची आई त्याला म्हणाली, ' मी अनुमति देतें. तूं संन्यासी हो !'

असें म्हणून ती खालीं कोसळली नि बेशुद्ध पडली !

आईची अनुमति मिळाल्याचें पहातांच मगरीच्या तावडींतून त्याला सोडविण्यासाठीं जाळें घेऊन त्याच्याकडे धांवत जात असलेल्या कोळ्यांना तो म्हणाला, ' लवकर या नि चारी बाजूंना जाळें पसरून मगरीला वेढून टाका.'

त्या कोळ्यांनीं एका क्षणाचाहि विलंब लावला नाहीं !

मगर जाळ्यांत सांपडली. कोळ्यांनीं तिला पकडलें. नदींबाहेर आल्यावर शंकर मोठ्यानें ओरडून आपल्या आईला म्हणाला, ' आई, ग आई, पहा मी जिवंत आहें. कोळ्यांनीं मगरीला पकडलें नि परमेश्वरानें माझें प्राणरक्षण केलें !'

विशिष्टेनें डोळे उघडले. शंकराला मिठी मारण्यासाठीं ती धांवत त्याच्यापाशीं गेली; पण नितक्यांत तिनें त्याच्या पायाकडे पाहिलें. मगरीनें त्याच्या पायांत आपले अणकुचीदार दांत खुपसले होते. अन् त्यामुळें त्याच्या पायांतून भळभळां रक्त वहात होतें !

विशिष्टेचे डोळे डबडबले ! ती मनांत म्हणाली, ' माझा मुलगा किती त्यागी आहे ! स्वतःच्या जिवाची पर्वा न बाळगतां तो माझी सेवा करीत असतो.'

योगायोगानें एक वैद्यहि त्याच वेळीं स्नानासाठीं तिथें आला होता. गलवला ऐकतांच तो शंकरापाशीं गेला. त्यानें औषध लावून रक्तस्राव थांबविला.

गांवांतल्या लोकांनीं शंकर नि विशिष्टा यांना त्यांच्या घरीं नेऊन सोडलें. घरीं पोहोंचल्यावर शंकर विशिष्टेला म्हणाला, 'आई, मीं संन्यास घेतला आहे. मला आतां घरीं कसें रहातां येईल? शास्त्राच्या नियमानुसार संन्याशानें घरीं रहातां कामा नये.'

विशिष्टेवर वज्रपात झाला! ती रडत रडत शंकराला म्हणाली, 'बाळा, असें बोलूं नकोस. अजून तूं वयानें लहान आहेस. घर सोडून बाहेर कसा राहशील? माझेंहि वय आतां आटोपत आलें आहे. मी मेल्यें, म्हणजे तूं घर सोड. मी जिवंत असेस्तोंवर तूं माझ्यासोबत रहा. माझ्या बाबतींत तुलाहि कांहीं कर्तव्य आहेच!'

पण शंकर दृढनिश्चयी होता!

तो आपल्या आईला म्हणाला, 'आई, तुझ्या आज्ञेनुसार संन्यास घेतला आहे मीं. आतां मला घर सोडणें भागच आहे.'

यावर विशिष्टेनें विचारलें, 'तूं जर घर सोडून गेलास, तर मला कोण सांभाळील? माझ्यासारख्या अनाथ विधवेला तीर्थयात्रा कोण घडवील? अन् मी मेल्यावर मला चितेवर चढवील कोण? तूं इथून जाऊं नकोस बाळा!'

इकडे आग अन् तिकडे वाघ अशी शंकराच्या मनाची द्विधा अवस्था झाली! एकीकडे जन्मदात्री माता होती अन् दुसरीकडे त्याचें महान कर्तव्य होतें. तीं दोन्ही त्याला आपल्याकडे ओढीत होतीं!

त्यांतून मार्ग कसा काढावा हें त्याला कळेनासें झालें, तेव्हां त्यानें आपले डोळे झांकले अन् तो देवाला आळवूं लागला, 'हे

प्रभो, मला सामर्थ्य दे ! हें मोहजाल तोडण्याची मला शक्ति दे ! माझ्या मार्गांत विघ्न आणणारा जो मायेचा पडदा माझ्या आईच्या डोळ्यांसमोर आंहे, तो तूं दूर कर ! माझ्या मातेला मनोबल दे ! ...'

कांहीं वेळानें त्यानें आपले डोळे उघडले अन् तो आपल्या आईला म्हणाला, ' ठीक आहे आई, एक गोष्ट मला सांग, ...'

विशिष्टा निमूटपणें त्याच्या तोंडाकडे पाहूं लागली !

शंकर म्हणाला, ' आई, ज्या परमकारुणिक परमेश्वरानें मला मगरीच्या मुखांतून वांचविलें, तो तुझा सांभाळ नाहीं का करणार ? त्या बाबतींत तुला काळजी करण्याचें कारणच काय मुळीं ! मी माझ्या मामाला बोलावून आणतों अन् सारी व्यवस्था करतों. देवाचें दर्शन घडण्याचा प्रयत्न करण्यासाठीं तूं मला आशीर्वाद दे. तुझा अंतकाळ जवळ आल्यावर तूं फक्त माझी आठवण कर, म्हणजे त्यावेळीं मी जिथें असेन, तिथून योगबलानें तुझ्यापाशीं येईन नि तुला परमेश्वराचें दर्शन घडवीन. साऱ्या तीर्थांत तेंच एक तीर्थ आहे, बाकी इतर गोष्टी निरर्थक आहेत ! आई, माझ्या वचनावर विश्वास ठेव. मी जें कांहीं बोललों आहें, तें खरें करून दाखवीनच दाखवीन !'

आपल्या मुलाच्या मनांत संन्यास-ग्रहणासाठीं पेटलेली आग त्यानें संन्यास घेतल्याशिवाय विझणें अशक्य आहे हें विशिष्टेनें ओळखलें. शंकराला आशीर्वाद दिल्यावर ती त्याला म्हणाली, ' जा बाळा, तुझा मनोरथ सफल होवो !'

त्यावर शंकर म्हणाला, ' आतां मला कसलेंच दुःख नाहीं; तथापि सन्याशाला लागणारीं काषाय वस्त्रें, दंड, कमंडलु, इत्यादि वस्तु तुझ्या हातानें मला मिळाव्या अशी माझी इच्छा आंहे. '

विशिष्टेच्या अंगांत दैवी सामर्थ्य संचरलें! तिनें रात्रीचा दिवस करून संन्यासग्रहणासाठीं लागणाऱ्या साऱ्या वस्तु जमविल्या!

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तिनें त्या साऱ्या वस्तु शंकराला दिल्या.

आपल्या आईची ती तत्परता पाहून शंकर चकित झाला. त्यानें यतिवेष धारण केला अन् आपल्या आईला साष्टांग प्रणिपात केल्यावर तो देवदर्शनासाठीं घरांतून बाहेर पडला!

त्यावेळीं अंतरिक्षांत सूर्याचा उदय होत होता; पण त्याच वेळीं एका महन्मंगल मातेच्या अंतःकरणांतला सूर्य अस्ताला जात होता!

काळजी घेतली नव्हती ! शांति नि श्रद्धा यांच्यामुळें त्याची भूक नि तहान हीं केव्हांच नष्ट झालीं होतीं !

बरेंच अंतर चालून गेल्यावर त्याला खळखळ असा आवाज ऐकूं आला, तेव्हां त्याच्या अंतःकरणांत आनंदाच्या उकळ्या फुटल्या ! इथें जवळच कुठें तरी नर्मदा नदी असली पाहिजे असें त्याला वाटल्यामुळें त्यानें पूर्वेकडे पाहिलें, तेव्हां चकाकत्या सूर्यप्रकाशांत, खडकांच्या मधोमध असलेली एक गुहा त्याला दिसली. ती पतंजलि मुनींची गुहा असून तिच्यांत ते तपश्चर्या करीत असले पाहिजेत अशी त्याची समजूत झाल्यामुळें तो मोठ्या सावधगिरीनें त्या गुहेच्या प्रवेशद्वारापाशीं गेला. त्यानें आंत वांकून पाहिलें, पण आंत कुणीच नव्हतें. असें असलें, तरी ती जंगली जनावरांचीहि गुहा नव्हती ! ती तशी असती तर त्या गुहेच्या आसपास त्याला जंगली जनावरांचीं पावलें उमटलेलीं दिसलीं असतीं.

शंकर त्या गुहेंत शिरला. गुहा आंतून कोरडी होती नि आंतली हवा थंड होती. शंकर आश्चर्यानें आजूबाजूस पाहूं लागला, तेव्हां त्याला एका ठिकाणीं प्रकाश दिसला. त्यानें दोन्ही हात जोडले नि डोळे मिटून देवाला विचारलें, ‘देवा, मी योग्य जागीं येऊन पोहोंचलों आहें का ?’

‘होय बाळा, तूं गोविंदपादाच्या गुहेंत आहेस.’

शंकराचें अंतःकरण अनिर्वचनीय आनंदानें भरून आलें !

त्यानें डोळे उघडून पाहिलें—समोर एक संन्यासी उभा होता !

शंकरानें त्याला प्रणाम केला नि विचारलें, ‘आपण कोण आहांत यतिवर ?’

संन्याशानें उत्तर दिलें, ‘माझें नांव गोविंदपाद. पतंजलींचा

शिष्य होण्यासाठीं मी इथें आलों आहें !'

त्या संन्याशाच्या प्रेमळ बोलण्यामुळें शंकराला जरासें हलकें वाटलें. त्यानें त्याला विचारलें, 'महर्षि पतंजलि कुठें आहेत?'

'तेहि इथेंच आहेत. ती जी गुहा दिसते आहे ना ? तिच्यांत ते समाधि लावून बसले आहेत. ते किती काळ तिथें बसले आहेत तें कुणालाच ठाऊक नाहीं ! त्यांची समाधि उतरण्याची वाट पहात मीहि या गुहेंत वास्तव्य करून आहें; पण तूं कोण आहेस बाळा ?' संन्याशानें विचारलें.

शंकरानें त्याला स्वतःसंबंधीं सारें सांगून टाकलें. त्याचें सांगणें ऐकल्यावर तो संन्यासी विस्मयचकित होऊन त्याच्याकडे पहातां पहातां मनांत म्हणाला, 'केरळ प्रांत किती दूर अन् हा मुलगा तिथून एकटाच चालत आला आहे इथवर !'

तो संन्यासी त्याला म्हणाला, 'बाळा, धन्य आहेत तूं अन् धन्य आहे तुझी गुरुभक्ति !'

शंकरानें पतंजलींच्या बाबतींत त्या संन्याशाला विचारल्या-वर त्यानें त्याला ठाऊक होतें तेवढें सारें शंकराला सांगितलें. शंकराचें अंतःकरण आश्चर्य अन् आनंद यांनीं भरून गेलें ! त्यानें त्या संन्याशाला हात जोडून विचारलें, 'मला त्यांचें दर्शन घडेल का ?'

उत्तरादाखल तो संन्यासी म्हणाला, 'हो, होईल दर्शन. या गुहेच्या आंत जी दुसरी गुहा आहे, तिच्यांत ते बसले आहेत; पण आंत अंधार आहे. तुला त्यांचें दर्शन घ्यायचें असेल तर हा दिवा घेऊन जा नि त्यांचें दर्शन घे.'

शंकर दिवा घेऊन आंत गेला. आंतल्या मंद प्रकाशांत एक यति पद्मासन घालून बसला होता. त्याचे डोळे झांकलेले होते.

त्याचें शरीर सुकून हाडांचा सांपळा शिल्लक राहिला होता. त्याच्या लांब लांब जटा डोक्याखालीं लोंबत होत्या. त्याचें नाक लांब होतें नि भालप्रदेश भव्य होता !



ध्यानमग्न पतंजलींना पहातांच शंकराला असीम आनंद झाला. डोळ्यांतील अश्रुधारा गुहेंतल्या जमिनीवर पडूं लागल्या !

कांहीं वेळानें त्यानें हात जोडले नि तो प्रार्थना करूं लागला, 'प्रभो, साऱ्या मुनींत आपण श्रेष्ठ आहांत. आपणांस शरण आलेल्या माणसांना ईश्वरी ज्ञान देण्यासाठींच आपण या भूतलावर आलां आहांत. भोलानाथ शंकराच्या हातांतील डमरूच्या आवाजा-इतकीच आपली महति मोठी आहे. मीहि ईश्वरी ज्ञान प्राप्त करून घेण्याच्या हेतूनें आज आपल्यापाशीं आलों आहें. आपण आपली समाधि उतरा अन् या शिष्याला ब्रह्मज्ञान देण्याची कृपा करा !'

शंकराच्या प्रार्थनेचा आवाज साऱ्या गुहेंत घुमला, त्याबरोबर आजूबाजूला बसलेले बरेचसे संन्यासी तिथें जमा झाले !

शंकराचें लक्ष पतंजलींकडे होतें. महामुनींचें शरीर थरथर कांपत असल्याचें त्याला दिसलें. थोड्याच वेळांत त्यांनीं आपले डोळे उघडले नि दीर्घश्वास सोडला !

शंकरानें पतंजलींना साष्टांग नमस्कार घातल्यावर बाकीचे संन्यासीहि त्यांच्या चरणस्पर्शासाठीं खालीं वांकले.

पतंजलींनीं शंकराला विचारलें, 'बाळा, तूं कोण अन् कुठून आलास ?'

शंकरानें सारें कांहीं सांगितल्यावर तो शंकराचा अवतार असल्याचें त्यांनीं ओळखलें ! हा मुलगा 'ब्रह्मसूत्र' नामक ग्रंथ लिहून त्याचा लोकांत प्रचार करील असें त्यांना वाटल्यामुळें त्यांनीं त्याला आपला शिष्य बनविलें नि ते त्याला योगविद्या शिकवूं लागले.

# सहा

केवळ एकाच वर्षाच्या अवधींत शंकरानें योगविद्येचें ज्ञान प्राप्त करून घेतलें ! तें ज्ञान प्राप्त करणाऱ्याला ‘ आचार्य ’ अशी संज्ञा होती, म्हणून मूळचा एकवचनी शंकर आतां शंकराचार्य या आदरार्थी बहुवचनानें संबोधिला जाऊं लागला ! त्यांना दूरचें बोलणें ऐकूं येत होतें अन् आकाशांतून संचार करतां येत होता. दुसऱ्याच्या शरीरांतहि प्रवेश करतां येत होता ! हें सारें योग-विद्येंतील सिद्धीमुळें घडत असे !

दुसऱ्या नि तिसऱ्या वर्षीं शंकराचार्यांनीं ध्यान नि समाधि यांचें ज्ञान प्राप्त करून घेतलें. ते सतत समाधि लावून बसूं लागले. त्यांच्या अंगांत दैवी तेज संचरलें. त्यांच्या चेहऱ्यावर तेज झळकूं लागलें !

शंकराचें शिक्षण नि साधना हीं पुरीं झालीं असें जेव्हां पतजलींना वाटलें, तेव्हां ते पुनश्च समाधि लावण्यासाठीं आपल्या गुहेंत गेले.

उन्हाळा संपला नि पावसाळ्याला सुरवात झाली. नर्मदा नदीचा कांठ हिरवागार दिसूं लागला. बरेच दिवसपर्यंत अविरत पाऊस पडूं लागल्यामुळें नर्मदा नदीला पूर आला नि म्हणतां म्हणतां त्याचें रूपांतर महापुरांत झालें. गांवांतील लोक आपलीं मुलेंबाळें नि गुरेंढोरें यांना घेऊन दुसऱ्या सुरक्षित स्थळीं निघून गेले; तथापि महामुनि पतंजलींनीं आपली गुहा सोडली नाहीं. पुराचें पाणी पसरत पसरत त्या गुहेपर्यंत आलें. पूर जास्त वाढल्यास पुराचें पाणी गुहेंत शिरणार नि महामुनींच्या जीवावर संकट कोसळणार असें त्यांच्या शिष्यांना वाटल्यामुळें ते काळजी करूं लागले !

सारे शिष्य शंकराचार्यांना सांगूं लागले, ' गुरुदेवांना वांचविण्यासाठीं कांहीं ना कांहींतरी उपाय करणें जरूर आहे; न पेक्षां थोड्याच वेळांत या गुहेंत पुराचें पाणी शिरेल अन् तसें झाल्यास गुरुदेवांना बाहेर काढणें फारच कठीण जाईल ! '

तितक्यांत एक शिष्य म्हणाला, ' गुरुदेवांचा देह इतक्यांत गगनांत गेला असेल उडून ! पुराच्या पाण्याला त्यांचें कांहींच वांकडें करतां येणार नाहीं. '

त्यावर औरसचौरस आकाराचा एक गलेलठ्ठ शिष्य बोलता झाला, ' गुरुदेवांच्या सामर्थ्यापुढें नर्मदेच्या पुराचें पाणी म्हणजे किस पेड की पत्ती ! तुम्ही काडीमात्र काळजी करू नका ! '

अशा प्रकारें प्रत्येक शिष्य आपापलें मत व्यक्त करूं लागला; पण शंकराचार्य मात्र कांहींच बोलत नव्हते ! ते शांतपणें आपल्या साथीदारांचें बोलणें ऐकून घेत होते !

तितक्यांत एक शिष्य त्यांना म्हणाला, ' तुम्हीं कसला विचार करीत आहांत ? आम्ही काय करावें तें सांगा ना ! '

शंकराचार्य म्हणाले, ‘मला कोणताच उपाय सुचत नाहीं!’

असें म्हणून ते अचानक उत्तर दिशेकडे जाऊं लागले. नदीकांठीं रहाणारे लोक त्याच दिशेकडे गेले होते.

शंकराचार्य कोणतीतरी सिद्धि प्राप्त करून घेण्यासाठीं गेले आहेत असें साऱ्या शिष्यांना वाटलें. तेहि त्यांच्यामागून धांवत सुटले!

कांहीं अंतर चालून गेल्यावर शंकराचार्यांना कांहीं लोक दिसले. शंकराचार्यांनीं त्यांच्याकडे एक मातीचें मडकें मागितल्यावर त्यांतला एक इसम मडकें आणण्यासाठीं धांवला. लगेच त्यानें मडकें आणलें.



शंकराचार्यांनीं तें मडकें गुहेच्या प्रवेशद्वारावर ठेवून दिलें अन् त्यानंतर ते बाकीच्या संन्याशांना म्हणाले, ‘तुम्ही कसलीच काळजी करूं नका अन् गुरुदेवांचा समाधिभंग करण्याचेंहि कारण

नाहीं ! पुराचें पाणी या मडक्यांत शिरणार. गुहेचें कांहींच नुक्सान होणार नाहीं !'

त्या शिष्यांना शंकराचार्यांचें तें करणें नि बोलणें हीं पोरकटपणाचीं वाटलीं; पण पुराचें पाणी मडक्यांत शिरून तें आंतल्याआंत जिरत असल्याचें त्यांनीं पाहिलें ! त्या गुहेंत एक थेंबभरहि पाणी शिरलें नव्हतें !

शंकराचार्यांचें तें अलौकिक सामर्थ्य पाहिल्यावर सारे थक्क झाले !

कांहीं वेळानें पतंजलि आपल्या गुहेंतून बाहेर आले. गुहेंतल्या संन्याशांनीं त्यांना शंकराचार्यांनीं केलेली कौतुकास्पद कामगिरी दाखविली.

पतंजलींनीं शंकराचार्यांच्या डोक्यावर आपला वरदहस्त ठेवला नि ते म्हणाले, 'पुत्रा, तूं खरोखरच शंकराचा अवतार आहेस. केव्हांतरी तूं नर्मदातटाकीं येणार अन् नर्मदेची घमेंड जिरवणार असें माझे गुरु गौडपाद यांनीं मला सांगितलें होतें. खरोखरच तूं आज नर्मदेची घमेंड जिरवलीस. अशाच प्रकारें तूं प्रांतोप्रांतीं संचार करून तिथल्या घमेंडखोर धर्मगुरूंची घमेंड जिरवशील असा मी तुला आशीर्वाद देतों !'

शंकराचार्यांनीं पतंजलींच्या पायांवर आपलें मस्तक ठेवलें अन् ते त्यांना म्हणाले, 'गुरुजी, आपल्या आशीर्वादानें मी तें काम अवश्य पार पाडीन.'

पतंजलि पुन्हां म्हणाले, 'बाळा, तुझ्या मनांत कोणत्याच प्रकारचा किंतु नाहीं ना ? आपल्यांत कांहींतरी उणें आहे असें नाहीं ना तुला वाटत ? तूं मला आणखीन् कांहीं विचारणार आहेस का ?'

त्यावर शंकराचार्य हंसून म्हणाले, 'भगवन्, आपल्या कृपेनें माझे सारे मनोरथ परिपूर्ण झाले आहेत. आपण आतां मला आज्ञा द्या, म्हणजे मी समाधि लावीन अन् ईश्वरस्वरूपांत विलीन होण्याचा प्रयत्न करीन.'

पतंजलि म्हणाले, 'हें काय बोलतोस शंकर? वैदिक धर्माचा प्रचार करण्यासाठींच तूं या अवनीतलावर उतरला आहेस. तुला खरें ईश्वरी ज्ञान लोकांना द्यायचें आहे. सध्यां भारतांत बौद्धधर्मीयांनीं धर्माचें खरें स्वरूप बिघडवून टाकलें आहे. जनता खऱ्या धर्माच्या शोधासाठीं इकडेतिकडे भटकत आहे. पहिल्याप्रथम तूं बनारसला जा. तिथें तुला शंकराचें दर्शन होईल. त्यानंतर तो तुला जसें सांगेल, तसें तूं कर.'

असें म्हणून पतंजलि पुन्हां आपल्या गुहेंत गेले. शंकराचार्यांनीं गुर्वाज्ञा प्रमाण मानली अन् आपल्या सहकाऱ्यांचा निरोप घेतल्यावर ते बनारसच्या दिशेनें चालूं लागले!

✦ ✦

# सात

आतां शंकराचार्यांच्या वयाला अकरा वर्षें होऊन चुकलीं होतीं. तेवढ्या त्या अल्पशा अवधींत त्यांनीं अशी योगसिद्धि प्राप्त केली होती कीं, त्यांचीं कार्यें पाहिल्यावर मोठमोठे महात्मे आश्चर्यचकित होत असत !

बनारसला जाऊन पोहोंचल्यावर शंकराचार्यांनीं मणिकर्णिका घाटावर एक पर्णकुटी बांधली नि तिच्यांत ते राहूं लागले. त्या काळीं गंगा नदीचे घाट पक्के बांधलेले नव्हते ! साधुसंतांनीं यावें अन् त्यांनीं कुठेंहि आपली झोंपडी बांधावी, इतकी त्यावेळीं त्यांना सवलत होती !

वाराणशीला वास्तव्य केल्यावर शंकराचार्य रोज प्रातःकाळीं उठत नि गंगास्नान केल्यावर ईश्वरचिंतनांत गढून जात.

एक अलौकिक सामर्थ्यसंपन्न असा बालसंन्यासी बनारसला आला आहे असें थोड्याच दिवसांत लोकांना समजलें अन् लोखंड ज्याप्रमाणें लोहचुंबकाकडे ओढलें जातें, त्याप्रमाणें ते लोक शंकराचार्य

चार्यांचें दर्शन घेण्यासाठीं त्यांच्या पर्णकुटींत येऊं लागले. होतां होतां शंकराचार्यांचें असामान्य ज्ञान नि मधुर व्यक्तिमत्व याविषयींची चर्चा घरोघरीं होऊं लागली नि नंतर परधर्मांतले पंडित अन् साधक त्यांचा उपदेश ऐकण्यासाठीं गंगेच्या घाटावर जमूं लागले. वैदिक धर्माचा पुन्हां फैलाव करण्यासाठींच आपण बनारसला आलों आहों असें ते त्यांचा उपदेश ऐकण्यासाठीं तेथें येणाऱ्या लोकांना सांगत असत.

बनारस हें प्राचीन कालापासून निरनिराळे धर्म नि संस्कृति यांचें केंद्रस्थान समजलें जातें. तिथें जैन, बौद्ध वगैरे निरनिराळ्या धर्माचे मोठमोठे महंत मठस्थापना करून रहात असत. शंकराचार्यांचा लौकिक ऐकल्यावर सर्व मतांचे लोक त्यांच्यापाशीं येऊं लागले ! त्यांची पर्णकुटी तीर्थरूप झाली !

हळूहळू तिथले विद्वान पंडित शंकराचार्यांशीं वेदांत विषयावर वादविवाद करूं लागले ! त्या अलौकिक बालसंन्याशाला वादविवादांत हरवायचें असा त्यांचा हेतु होता; तथापि शंकराचार्य त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें अशा रीतीनें देत असत कीं, ते आपण पराजित झाल्याचें कबूल करून तिथून निघून जात ! कांहीं लोक वादविवादांत हरले, तरीहि ते स्वत:ला धन्य समजत असत; तथापि कांहीं लोक मात्र त्यांचा द्वेष करीत असत !

एके दिवशीं शंकराचार्य आपल्या कुटींत ध्यानस्थ बसले होते. इतक्यांत एक तरुण त्या कुटींत शिरला नि त्यानें त्या कुटीचें दार आंतून बंद केलें, त्याबरोबर कुटींत अंधार पसरला नि शंकराचार्यांचें ध्यान तुटलें !

तो तरुण शंकराचार्यांच्या पुढ्यांत जाऊन बसला.

शंकराचार्यांनी त्याला विचारलें, ‘आपण कोण आहांत? माझ्याकडे कोणत्या हेतूनें आलां आहांत?’

उत्तरादाखल तो तरुण म्हणाला, ‘मी चोल प्रांतांतून आलों असून माझें नांव सनंदन असें आहे.’

त्यावर शंकराचार्य त्याला शांतपणें म्हणाले, ‘माझ्या बोलण्यामुळें वाईट वाटून घेऊं नका. मी आपल्यासारखाच एक सामान्य माणूस आहें. आपण केवळ दर्शनासाठीच आलां असाल, तर देवाची पूजाअर्चा करा, म्हणजे तो आपल्याला दर्शन देईल.’

सनंदन म्हणाला, ‘महात्मन्, आपणहि परमेश्वरस्वरूपच आहांत. मीं जें ऐकलें होतें, तसेच आपण मला दिसताहांत. आपण मला कांहींतरी नवीन गोष्ट स..ा.’

असें म्हणून तो तरुण उठला नि जवळचा कमंडलु उचलून तो त्यानें शंकराचार्यांवर फेकला!

शंकराचार्य जरासुद्धां घाबरले नाहींत. ते जागच्या जागीं स्वस्थ बसले होते. कमंडलु त्यांच्या डोक्याला लागल्यामुळें डोक्यांतून रक्ताच्या धारा वाहूं लागल्या!

सनंदनानें लगेच शंकराचार्यांचे पाय धरले अन् तो त्यांना म्हणाला, ‘भगवन्, मी आपला शिष्य होण्यासाठीं आपल्याकडे आलों आहें. मी आपल्या डोक्यावर कमंडलु मारून आपली परीक्षा पाहिली. डोक्याला जखम झाली असतांहि आपण व्याकुळ झालां नाहीं! आपण खरोखर भोलानाथ शंकराचा अवतार आहांत. आपल्या कृपेनें माझ्या जन्माचें सार्थक होईल. मी आपल्याकडून आत्मज्ञान मिळवून धन्य होईन. आपण मला आपला शिष्य करून घ्या.’

‘जो माणूस दुसऱ्याला जखम झाली असतांहि कळवळत

नाहीं, अशा दुष्ट माणसाला शिष्य करून घ्यायला मी तयार नाहीं !' शंकराचार्य म्हणाले.

सनंदन वारंवार माफी मागूं लागला; पण त्याला शिष्य करून घ्यायला शंकराचार्य तयार झाले नाहींत !


सनंदनानें आपल्या अंगावरचें वस्त्र फाडलें नि त्या वस्त्रानें जखमेवरचें रक्त पुसून काढलें ! शंकराचार्य त्याच्याशीं कांहींच बोलले नाहींत !

सनंदन स्वत: उपाशीतापाशी राहून शंकराचार्यांना राजी राखण्याचा प्रयत्न करीत असे. तो रोज पहांटेला उठून पर्णकुटी झाडून स्वच्छ करी. त्यानंतर तो जंगलांत जाई नि कंदमुळें आणून ठेवी. संध्याकाळ झाल्यावर कुटींत दिवा पेटवून ठेवी.

पण शंकराचार्य त्याच्याकडे डोळे उघडून पहात नसत !

एके दिवशीं दुपारीं कुठूनतरी एक वाघ शंकराचार्यांच्या पर्णकुटीपाशीं आला. त्यावेळीं शंकराचार्य पर्णकुटींत गाढ झोंपले होते. तो वाघ आतां पर्णकुटींत शिरणार असें सनंदनाला वाटलें, म्हणून तो हातांत कमंडलु घेऊन वाघाच्या अंगावर धांवून गेला, त्याबरोबर त्या वाघानेंहि सनंदनाच्या अंगावर झेप घेतली; पण सनंदन जरासुद्धां घाबरला नाहीं. तो त्या वाघावर कमंडलूचे तडाखे लगावूं लागला ! तो वाघ केव्हां गुरगुरत मागें जाई, तर केव्हां सनंदनाच्या अंगाचा लचका तोडण्यासाठीं धांवत पुढें येई ! दोघेहि एकमेकांना हरवूं पहात होते ! तो बलवान वाघ रागानें बेभान झाला होता ! कमंडलूच्या तडाख्यांमुळें त्याच्या अंगाला दोन तीन जखमाहि झाल्या होत्या !

आतां मात्र तो वाघ खरोखरच खवळला ! त्यानें आपला जबडा वासला, दांत बाहेर काढले, मिशा ताठ केल्या नि मागच्या



दोन पायांत शेपूट घालून त्यानें सनंदनावर हल्ला करण्याचा पवित्रा घेतला; तथापि सनंदनानें मात्र त्या वाघाची जरासुद्धां पर्वा केली नाहीं! त्यानें आपल्या हातांतला कमंडलु भिरकावून दिला नि आपले दोन्ही दंड थोपटल्यावर तो त्या वाघाला जाऊन भिडला! वाघ त्याला चावे घेण्याचा प्रयत्न करूं लागला; पण त्यावेळीं सनंदनाच्या अंगांत कुठून बळ आलें कोण जाणे, तो त्या वाघाचा प्रत्येक प्रयत्न हाणून पाडूं लागला!

थोडा वेळ ते दोघेहि मोठ्या हिंमतीनें लढत होते. शेवटीं सनंदनानें त्या वाघाच्या जबड्यावर एक जोराचा ठोसा लगावतांच तो वाघ सनंदनाच्या अंगावर कोसळला; पण सनंदन तितक्यांत चटकन बाजूला सरला! तसें त्यानें केलें नसतें तर त्या वजनदार वाघानें त्याला चिरडून मारलें असतें! आपला प्रयत्न

फुकट गेल्याचें पहातांच तो वाघ चिडला नि त्यानें आरोळी ठोकली ! त्या आरोळीचा आवाज नदीकांठच्या जंगलांत घुमला !

अन् त्याच वेळीं शंकराचार्यांना जाग आली. ते पर्णकुटीच्या बाहेर आले नि सनंदन वाघाशीं झुंजत असल्याचें पाहून भयभीत झाले !

त्यांनीं डोळे झांकले नि ते कसलासा मंत्र म्हणूं लागले, त्याबरोबर तो वाघ डरकाळ्या फोडीत जंगलांत निघून गेला !

शंकराचार्य सनंदनापाशीं गेले. त्यांनीं त्याला वर उठविलें नि ते त्याला म्हणाले, ' सनंदन, आज मी तुला माझा पट्टशिष्य बनवितों ! '

वाघानें सनंदनाचें अंग बऱ्याच ठिकाणीं फाडलें होतें ! त्याच्या खांद्याचा लचका खालीं लोंबत होता; पण सनंदनानें आपल्या देहाची जरासुद्धां तमा न बाळगतां शंकराचार्यांचे पाय धरले !

सनंदनाची गुरुभक्ति अनुपम होती ! त्यानें आपल्या प्राणाची पर्वा न करतां स्वतःचा देह संकटांत घालून गुरूचा जीव बांचविला होता !

✦ ✦

# आठ

शंकराचार्य परमेश्वर-पूजनांत मग्न असत नि त्या कारणानें इतर साऱ्या गोष्टी ते विसरून जात ! 'फक्त एकटा परमेश्वरच खरा आहे, बाकी सारें खोटें आहे; सर्वत्र परमेश्वराचें सामर्थ्य भरलेलें आहे; साधन, भजन, पूजन इत्यादि केल्यावर जेव्हां माणसाचें मन निर्मल होतें तेव्हां त्याला प्रत्यक्ष परमेश्वराचें दर्शन घडतें. समाधि लावल्यावर फक्त केवळ सत्याचेंच दर्शन घडतें; पण प्राणिमात्रांची सेवा केल्यावर परमेश्वर प्रसन्न होतो नि त्याच्या प्रसन्नतेमुळें माणसाला सारें कांहीं प्राप्त होतें...' शंकराचार्य रात्रंदिवस अशा प्रकारच्या विचारांत गढून जात होते.

ते पहांटेला सनंदनासह गंगास्नानसाठीं जात अन् दिवस उगवण्यापूर्वीं आपल्या पर्णकुटींत परत येत.

एके दिवशीं ते नित्यनियमानुसार गंगास्नानाला चालले असतांना एक स्त्री वाटेंत बसली असल्याचें त्यांनीं पाहिलें. तिनें सारी वाट अडविली होती. शंकराचार्य ती बाई बाजूला होण्याची

वाट पहात तिथेंच उभे राहिले. स्नानालाहि उशीर होत होता; तथापि ती बाई वाटेवरून उठायला तयार नव्हती ! तिच्या बाजूला असलेल्या प्रेताकडे शंकराचार्यांची अचानक नजर गेली. शंकराचार्य अधीर होऊन त्या बाईला म्हणाले, 'माताजी, तें प्रेत जर तुम्हीं बाजूला केलंत तर आम्हांला पुढें जायला वाट मोकळी होईल.'

ती बाई आपल्या दुःखांत इतकी बुडून गेली होती कीं, शंकराचार्यांना तिनें कांहींच उत्तर दिलें नाहीं !

शंकराचार्य तिची वारंवार विनवणी करीत होते !

अखेरीस ती बाई त्यांना म्हणाली, 'महात्मन्, आपण त्या प्रेताला तसें कां नाहीं सांगत ?'

त्यावर शंकराचार्य तिला म्हणाले, 'आई, शोकामुळें तुला स्वतःचा विसर कसा पडला ? कितीहि झालें तरी प्रेत बाजूला होणें शक्य आहे का ? निष्प्राण देहांत तेवढी ताकद असते का ?'

त्या बाईनें शंकराचार्यांकडे पाहिलें नि ती त्यांना म्हणाली, 'कां महात्मन्, सारा संसार दैवी सामर्थ्यानें भरलेला आहे असें आपण उपदेशाच्या वेळीं सर्वांना सांगत असतां; मग या प्रेतांत दैवी सामर्थ्य नाहीं का ? अन् जर तें नसेल तर निःशक्त प्रेत बाजूला हटेल कसें ?'

त्या स्त्रीनें ज्ञानाची गोष्ट सांगितली होती. ती ऐकतांच आचार्य विचारांत पडले. त्यांनीं डोळे झांकून कोणतातरी मंत्र म्हणतांच ती स्त्री अन् तें प्रेत हीं दोन्ही अदृश्य झालीं ! एका क्षणांत हें सारें घडून आलें !!

आचार्यांचें अंतःकरण अनिर्वचनीय आनंदानें भरून आलें ! यांना परमेश्वरी लीलेचा अंतर्बाह्य अनुभव आला !

ते सनंदनाला म्हणाले, 'सनंदन, तुला ईश्वरी सामर्थ्याचा अनुभव आला आज !'

'होय गुरुदेव !' सनंदनानें सांगितलें.

त्यानंतर शंकराचार्य म्हणाले, 'सनंदन, मला ब्रह्मा, विष्णु, इंद्र, चंद्र इत्यादिकांपैकीं कोणतीहि देवता माहीत नाहीं ! जो जल, स्थल, अग्नि, पर्वत, जंगल, इत्यादिकांत माझें रक्षण करतो, त्या परमेश्वराला फक्त मी शरण जातों ! सांग, तुला कोणत्या देवाचें रक्षण हवें ?'

'फक्त आपलेंच रक्षण हवें भगवन् ! आपण मला सत्याचें दर्शन घडविलें आहे ! त्या ज्ञानाचा प्रकाश फैलावण्यासाठीं आतां आपल्याला पुढें गेलें पाहिजे.' सनंदन म्हणाला.

पर्णकुटींत परतल्यावर शंकराचार्यांनीं सनंदनाला सांगितलें, 'सनंदन, आतां बनारस सोडून आपल्याला प्रयाग नि हरिद्वार येथें जायचें आहे. ताबडतोब प्रवासाच्या तयारीला लाग !'

गुरुजींच्या आज्ञेनुसार सनंदनानें हां हां म्हणतां प्रवासाची तयारी केली ! तयारी ती कसली करायची होती म्हणा ! त्या पर्णकुटींत दंड, कमंडलु, काषाय वस्त्रें नि दोन घोंगड्या यांच्या-शिवाय आणखीं होतेंच काय मुळीं ! सनंदनानें सारें सामान उच-ललें अन् तो शंकराचार्यांबरोबर चालूं लागला !

त्या गुरु-शिष्याच्या जोडीकडे लोक नवलपूर्ण नजरेनें पहात होते ! किती विचित्र गोष्ट होती– वयाच्या नि देहाच्या दृष्टीनें गुरु छोटा अन् शिष्य मोठा ! असें कुणी कधीं पाहिलें नव्हतें नि ऐकलेंहि नव्हतें ! शहाणींसुर्तीं माणसें तो देखावा मुका-ट्यानें पहात असत; पण मूर्ख माणसें त्या दोघांवरहि चिखल

वाट पहात तिथेंच उभे राहिले. स्नानालाहि उशीर होत होता; तथापि ती बाई वाटेवरून उठायला तयार नव्हती! तिच्या बाजूला असलेल्या प्रेताकडे शंकराचार्यांची अचानक नजर गेली. शंकराचार्य अधीर होऊन त्या बाईला म्हणाले, 'माताजी, तें प्रेत जर तुम्हीं बाजूला केलंत तर आम्हांला पुढें जायला वाट मोकळी होईल.'

ती बाई आपल्या दुःखांत इतकी बुडून गेली होती कीं, शंकराचार्यांना तिनें कांहींच उत्तर दिलें नाहीं!

शंकराचार्य तिची वारंवार विनवणी करीत होते!

अखेरीस ती बाई त्यांना म्हणाली, 'महात्मन्, आपण त्या प्रेताला तसें कां नाहीं सांगत?'

त्यावर शंकराचार्य तिला म्हणाले, 'आई, शोकामुळें तुला स्वतःचा विसर कसा पडला? कितीहि झालें तरी प्रेत बाजूला होणें शक्य आहे का? निष्प्राण देहांत तेवढी ताकद असते का?'

त्या बाईनें शंकराचार्यांकडे पाहिलें नि ती त्यांना म्हणाली, 'कां महात्मन्, सारा संसार दैवी सामर्थ्यानें भरलेला आहे असें आपण उपदेशाच्या वेळीं सर्वांना सांगत असतां; मग या प्रेतांत दैवी सामर्थ्य नाहीं का? अन् जर तें नसेल तर निःशक्त प्रेत बाजूला हटेल कसें?'

त्या स्त्रीनें ज्ञानाची गोष्ट सांगितली होती. ती ऐकतांच आचार्य विचारांत पडले. त्यांनीं डोळे झांकून कोणतातरी मंत्र म्हणतांच ती स्त्री अन् तें प्रेत हीं दोन्ही अदृश्य झालीं! एका क्षणांत हें सारें घडून आलें!!

आचार्यांचें अंतःकरण अनिर्वचनीय आनंदानें भरून आलें! यांना परमेश्वरी लीलेचा अंतर्बाह्य अनुभव आला!

ते सनंदनाला म्हणाले, 'सनंदन, तुला ईश्वरी सामर्थ्याचा अनुभव आला आज !'

'होय गुरुदेव !' सनंदनानें सांगितलें.

त्यानंतर शंकराचार्य म्हणाले, 'सनंदन, मला ब्रह्मा, विष्णु, इंद्र, चंद्र इत्यादिकांपैकीं कोणतीहि देवता माहीत नाहीं ! जो जल, स्थल, अग्नि, पर्वत, जंगल, इत्यादिकांत माझें रक्षण करतो, त्या परमेश्वराला फक्त मी शरण जातों ! सांग, तुला कोणत्या देवाचें रक्षण हवें ?'

'फक्त आपलेंच रक्षण हवें भगवन् ! आपण मला सत्याचें दर्शन घडविलें आहे ! त्या ज्ञानाचा प्रकाश फैलावण्यासाठीं आतां आपल्याला पुढें गेलें पाहिजे.' सनंदन म्हणाला.

पर्णकुटींत परतल्यावर शंकराचार्यांनीं सनंदनाला सांगितलें, 'सनंदन, आतां बनारस सोडून आपल्याला प्रयाग नि हरिद्वार येथें जायचें आहे. ताबडतोब प्रवासाच्या तयारीला लाग !'

गुरुजींच्या आज्ञेनुसार सनंदनानें हां हां म्हणतां प्रवासाची तयारी केली ! तयारी ती कसली करायची होती म्हणा ! त्या पर्णकुटींत दंड, कमंडलु, काषाय वस्त्रें नि दोन घोंगड्या यांच्याशिवाय आणखीं होतेंच काय मुळीं ! सनंदनानें सारें सामान उचललें अन् तो शंकराचार्यांबरोबर चालूं लागला !

त्या गुरु-शिष्याच्या जोडीकडे लोक नवलपूर्ण नजरेनें पहात होते ! किती विचित्र गोष्ट होती– वयाच्या नि देहाच्या दृष्टीनें गुरु छोटा अन् शिष्य मोठा ! असें कुणी कधीं पाहिलें नव्हतें नि ऐकलेंहि नव्हतें ! शहाणींसुर्तीं माणसें तो देखावा मुकाट्यानें पहात असत; पण मूर्ख माणसें त्या दोघांवरहि चिखल

उडवीत असत ! असें असलें, तरी आपल्या उपदेशाच्याद्वारें शंकराचार्य त्यांना लज्जित करीत असत !

ते बनारसपासून बरेच दूर गेल्यावर सोबत सातआठ कुत्रे घेतलेला एक चांडाल समोरून येत असल्याचें शंकराचार्यांनीं पाहिलें. चांडालाचा वर्ण काळाकुट्ट होता नि त्याचा चेहरा भेसूर दिसत होता ! त्या कुत्र्यांच्या अंगावरहि गोचिडा होत्या नि त्यांच्या अंगाला घाण येत होती !

शंकराचार्य चांडालाला म्हणाले, ' अरे चांडाला, त्या कुत्र्यां सह तूं रस्त्याच्या बाजूला कां नाहीं उभा रहात ? तूं रस्त्याच्या मधून चालत आहेस. आतां मला सांग, आम्ही कोणत्या वाटेनें जावें ?'

त्या चांडालानें शंकराचार्यांच्या बोलण्याकडे लक्षच दिलें नाहीं ! तो बेदरकारपणें पुढें चालूं लागला !

आतां मात्र शंकराचार्यांना थोडासा राग आला ! ते त्याला म्हणाले, ' माझें सांगणें जरासुद्धां ऐकत नाहींस ! तूं किती उद्धट आहेस ? ते कुत्रे बाजूला ने नि आम्हांला मार्ग मोकळा करून दे !'

शंकराचार्यांचें बोलणें ऐकलें न ऐकलेंसें करून तो चांडाल खदखदां हंसत शंकराचार्यांना म्हणाला, ' तूं बाजूला हो म्हणून कुणाला सांगतोस ? आत्म्याला कीं देहाला ? आत्मा तर सर्व ठिकाणीं असल्यानें तो बाजूला हटण्याचा प्रश्नच निर्माण होत नाहीं अन् देहाला तसें सांगत असशील तर तो जड आहे; मग तो बाजूला कसा होणार ? ज्ञान-ध्यानाच्या गोष्टी पुरता शिकला नाहींस अन् इतकी घमेंड मिरवतोस कशाला ? तुझ्यांत नि माझ्यांत काय फरक आहे ? ज्या परमेश्वरानें तुला जन्म दिला,

त्याच परमेश्वरानें मला नि या कुत्र्यांनाहि जन्म दिला आहे! मग तुझा महात्मापणा तो हाच का ?'

चांडालाचें तें तत्त्वज्ञान ऐकतांच शंकराचार्य अवाक् झाले! त्यांनीं त्याची क्षमा मागितली नि देवाची प्रार्थना केली, 'प्रभो, जगांतल्या प्रत्येक वस्तूंत तूं सामावला आहेस! तूंच मला खरा मार्ग दाखव आतां!'

तो चांडाल कुत्र्यांसह अचानक अदृश्य झाला!

शंकराचार्य देवाचें भजन करीत प्रयागची वाट चालूं लागले.

# नऊ

त्या काळीं भारतांत अनेक लहान लहान राज्यं होतीं अन् त्यांच्या आपापसांत वारंवार लढाया होत असत. साऱ्या भारताला ऐक्याच्या सूत्रांत बांधणारा असा एकछत्र राजा त्या काळीं कुणीहि नव्हता. हिंदु लोक निरनिराळ्या देवांना भजत असत; तथापि त्या काळच्या राजांपैकीं बऱ्याचशा राजांनीं बौद्ध धर्म स्वीकारला होता म्हणून भारतांत त्या धर्माचा बराच प्रसार झाला होता. बौद्ध आचार्य लोकांना सांगत, 'राजे आमचे आहेत, देश आमचा आहे; त्यासाठीं तुम्ही आमचा बौद्ध धर्म स्वीकारा. वैदिक धर्म सोडून द्या. वेदांवर विश्वास ठेवणें मूर्खपणाचें आहे; कारण वेद-वचनें परस्परांशीं विरुद्ध आहेत...'

त्या बौद्ध आचार्यांत महापंडित कुमारिलभट्टांचें नांव फारच प्रसिद्ध होतें. त्यांच्याशीं टक्कर देणारा विद्वान कोणीहि नव्हता. शंकराचार्य जेव्हां प्रयागला आले, तेव्हां त्यांना ही गोष्ट कळली अन् वेदांत विषयावर कुमारिलभट्टांशीं आपण वादविवाद करावा असें त्यांना वाटूं लागलें !

शंकराचार्य आपल्या शिष्यांसमवेत शांतपणें एका झाडाखालीं विश्रांति घेत होते. तितक्यांत कुमारिलभट्ट अग्निकाष्ठें भक्षण करण्यासाठीं जात असल्याचें त्यांना आढळलें.

त्याबरोबर ते कुमारिलभट्टांना भेटण्यासाठीं जाऊं लागले. चालतां चालतां दूरवर एका टेकडीच्या पायथ्याशीं रचलेल्या लांकडाच्या ढिगांतून आगीच्या ज्वाळा बाहेर पडत असल्याचें त्यांना दिसलें. त्या ढिगापाशीं कुमारिलभट्टांचे दु:खी झालेले बरेच शिष्य उभे होते.

कुमारिलभट्टांनीं तोंपर्यंत शंकराचार्यांना कधीं पाहिलें नव्हतें. फक्त त्यांचें नांव नि अलौकिक यश हीं मात्र त्यांना माहीत होतीं.

आपल्यासमोर शंकराचार्यांना पहातांच कुमारिलभट्ट त्यांना म्हणाले, 'महात्मन्, माझ्या हातून कोणतें तरी पुण्यकर्म घडलें होतें नि त्यामुळेंच मला आज आपलें दर्शन घडलें. मी संसारांतल्या सुखदु:खांच्या आधीन आहें. मी माझ्या आजवरच्या आयुष्यांत बरीचशीं सुखदु:खें भोगलीं आहेत; पण माझ्याकडून एक मोठा अपराध घडला आहे, म्हणून मी आज आगींत उडी टाकून हा माझा देह नष्ट करणार आहें !'

कुमारिलभट्टांचें बोलणें ऐकल्यावर शंकराचार्य म्हणाले, 'अपराध घडल्यावर आगींत उडी टाकून जीव देणें हें कोणत्या शास्त्रांत लिहिलें आहे ? हा तर भ्याडपणा आहे. आपण माझें मत ऐका. आपल्याला मी उपाय सांगतों.'

तेथें उभ्या असलेल्या साऱ्या लोकांनीं शंकराचार्यांच्या म्हणण्यास आपली मान्यता दर्शविली.

कुमारिलभट्ट क्षणभर स्तंभित झाले नि नंतर म्हणाले,

'नकळत माझ्या हातून गुरुहत्त्या घडली असल्यानें जिवंत रहाण्याची माझी इच्छा नाहीं अन् माझा अंतकाळ जवळ आल्यानें मला आपल्याशीं वादविवादहि करतां येत नाहीं !'

त्यावर शंकराचार्य उत्तेजित स्वरांत त्यांना म्हणाले, 'तर मग आपल्याला वेदांचें खंडन करण्याचाहि अधिकार नाहीं ! आगींत जाळून घेण्याचीच जर आपली इच्छा असेल, तर तत्पूर्वी वादविवादांत हरल्याचें आपण कबूल करा !'

कुमारिलभट्टांनीं आपण वादविवादांत हरल्याचें आतांपर्यंत कुणापाशींहि कबूल केलें नव्हतें; पण आज चौदा वर्षांचा एक बालसंन्यासी आपल्या बोलण्यानें त्यांना हरवीत होता !

ते गंभीर स्वरांत आचार्यांना म्हणाले, 'आचार्य, माझी एक अट आहे. आपण जर वादविवादांत हरलांत, तर माझ्याऐवजीं आपल्याला आगींत उडी घ्यावी लागेल अन् जर मी हरलों, तर मी आत्मदाह करीन !'

त्यावर शंकराचार्य कुमारिलभट्टांना म्हणाले, 'आपली अट मला मान्य आहे !'

तिथल्या तिथेंच वेदांत विषयावरील वादविवादाला सुरुवात झाली ! केव्हां शंकराचार्यांचें पारडें जड होई, तर केव्हां कुमारिलभट्टांचें ! दोघेहि धुरंधर विद्वान होते ! वादविवादांत कोण हरेल नि कोण जिंकेल हें कुणालाहि सांगतां येत नव्हतें ! अखेर शंकराचार्यांनीं कुमारिलभट्टांना असा एक अवघड प्रश्न विचारला कीं, त्याचें त्यांना उत्तर देतां येईनासें झालें नि त्यामुळें कुमारिलभट्टांना आपण हरल्याचें कबूल करावें लागलें !

कुमारिलभट्टांनीं वैदिक धर्माची श्रेष्ठता मानल्याचें पाहिल्यावर साऱ्या श्रोत्यांनीं शंकराचार्यांचा जयजयकार केला ! त्या

दिवसापासून लाखों लोक शंकराचार्यांचे शिष्य झाले नि बौद्ध धर्माचा त्याग करून ते वैदिक धर्माच्या झेंड्याखालीं आले !

शंकराचार्यांनी वेदांची प्रामाणिकता सिद्ध केल्यानंतर वैदिक धर्माच्या प्रचारासाठीं आपल्या शिष्यांना दूर दूर पाठवून दिलें.

त्यांचें प्रचारकार्य चालू असतानाच कुमारिलभट्टांनीं आगींत उडी टाकून आत्महत्या केल्याचें शंकराचार्यांना कळलें.

शंकराचार्यांना वाईट वाटलें. ते म्हणाले, ' ज्यावेळीं माणसाला शरीराचा भार सहन करतां येत नाहीं, त्यावेळीं तो आत्महत्या करतो; पण आत्मा अमर असल्यानें त्याला मारतां येत नाहीं अन् त्या दृष्टीनें विचार केल्यास कुमारिलभट्ट हे अमर आहेत असेंच म्हणावें लागेल !' असें म्हणून त्यांनीं तो विषय तिथेंच संपविला !

प्रयागपासून थोड्या अंतरावर मंडनमिश्र नांवाचे एक विद्वान् पंडित रहात असल्याचें दुसऱ्या दिवशीं शंकराचार्यांना समजलें. आपण जर त्यांना वादविवादांत हरविलें, तर आपण दिग्विजयी ठरूं असें शंकराचार्यांना वाटलें, म्हणून ते प्रयाग सोडून मंडनमिश्रांना भेटण्यासाठीं निघाले.

वाटेंत त्यांना कांहीं संन्यासी भेटले. त्यांनीं शंकराचार्यांना सांगितलें कीं, ' मंडनमिश्रांची धर्मपत्नी भारती ही भारतांतली श्रेष्ठ विदुषी असल्यामुळें वादविवादाचा निर्णय तिच्याकडूनच झाला पाहिजे. '

मंडनमिश्र महिष्मती नगरांत रहात होते. महिष्मती हें नर्मदा नदीच्या कांठावरचें एक प्रसिद्ध नगर होतें.

जवळजवळ पंधरवडाभर प्रवास केल्यावर शंकराचार्य महिष्मती नगरांत आले अन् त्यांनीं मंडनमिश्रांच्या घराची चौकशी

केल्यावर त्यांना ज्या घरांतील पाळीव पोपट वेदांत विषयावर वादविवाद करीत असतात, तें घर मंडनमिश्रांचें आहें असें कळलें!

शंकराचार्यांना नवल वाटलें! ते मनांत म्हणाले, 'ज्या घराचे पशुपक्षी वेदांताची भाषा बोलतात, त्या घराचा मालक किती विद्वान असेल!'

शंकराचार्य थोडेसे पुढें गेल्यावर त्यांना मंडनमिश्रांचें घर सांपडलें; पण त्या घराचा पुढील दरवाजा बंद होता. मंडनमिश्र आंत आपल्या वडिलांचें श्राद्धकर्म करीत आहेत असें द्वारपालानें शंकराचार्यांना सांगितलें; इतकेंच नव्हे, तर ते आज कुणाचीहि भेट घेणार नाहींत असेंहि सांगायला त्यानें कमी केलें नाहीं!

आपण आल्याचें तूं मंडनमिश्रांना सांग म्हणून त्यांनीं त्या उद्दाम द्वारपालाची गोड शब्दांनीं विनवणी केली; तथापि त्यानें ती मानली नाहीं!

तें पहातांच त्यांनीं योगविद्येच्याद्वारें आपलें शरीर सूक्ष्म बनविलें नि ते मंडनमिश्रांच्या घरांत घुसले! द्वारपाल पहातच राहिला! अखेर त्यानें त्यांच्याबरोबर असलेल्या शिष्यांची एका जागेंत सोय केली!

मंडनमिश्रांनींहि कांहीं मंत्र सिद्ध केले होते. शंकराचार्यांना समोर पहातांच ते फारच विस्मित झाले!

शंकराचार्यांनीं आपलें पूर्वरूप धारण केलें नि नंतर मंडनमिश्रांना प्रणाम केला.

मंडनमिश्रांना राग आला. त्यांनीं शंकराचार्यांना विचारलें, 'संन्यासी, श्राद्धसमयीं कशाला आलांत?'

शंकराचार्यांनीं त्यांच्या प्रश्नाचें उत्तर निराळ्या पद्धतीनें दिलें! ते म्हणाले, 'मी माझ्या देशांतून आलों आहें महात्मन्!'

'आपल्या देशाचें नांव काय?' मंडनमिश्रांनीं प्रश्न केला.

'कां? माझ्या देशानें आपल्याला कांहीं विचारलें आहे का?'

शंकराचार्यांचें तें उडवाउडवीचें उत्तर ऐकतांच मंडनमिश्रांच्या अंगाची आग झाली! ते म्हणाले, 'आपलें डोकें...'

त्यावर शंकराचार्य हंसत हंसत म्हणाले, 'माझें मुंडन केलेलें डोकें अजून शाबूत आहे! तें मुळींच बिघडलेलें नाहीं!'

'आपण सुरापान केलें आहे का?' मंडनमिश्रांनीं विचारलें.

'सुरा पीतवर्णी असते का?' शंकराचार्यांनीं त्यांना प्रतिप्रश्न केला.

मंडनमिश्रांचा क्रोध अनावर झाला. एखाद्या घमेंडखोर नि उद्धत अशा संन्याशानें उत्तरें द्यावीं, तशीं शंकराचार्यांनीं त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें दिलीं होतीं! त्यांनीं मंडनमिश्रांचा प्रत्येक प्रश्न शांतपणें उडवून लावला होता!!

मंडनमिश्र आणखी कांहींतरी कठोर बोलणार होते, पण तितक्यांत त्यांच्या बाजूला बसलेले व्यासदेव त्यांना म्हणाले, 'मीं यांना ओळखलें आहे. हे शंकराचार्य आहेत. आपल्याकडे आलेल्या अतिथीचा आदरसत्कार आपण केला पाहिजे.'

मंडनमिश्र लज्जित झाले! त्यांनीं शंकराचार्यांची माफी मागितली नि आपल्या घरीं भोजनास रहाण्याची त्यांना विनंति केली.

त्यावर शंकराचार्य म्हणाले, 'महापंडित, मी आपल्या घरचें अन्न खाण्यासाठीं आपल्याकडे आलों नसून आपल्याशीं वेदांतविषयक वादविवाद करण्यासाठीं आलों आहें. शास्त्रार्थांत जो हरेल त्यानें दुसऱ्याचें शिष्यत्व पत्करलें पाहिजे. मला वादविवाद

करण्याची अनुज्ञा द्या, मी आपल्याला हरवून एक नवीन ग्रंथ लिहिणार आहें.'

मंडनमिश्र विचारांत पडले. ते शंकराचार्यांना म्हणाले, 'आपली अट मला मान्य आहे. आज मी माझें श्राद्धकर्म आटोपून घेतों. उद्यां प्रात:काळीं वादविवादाला सुरुवात होईल.'

त्यावर शंकराचार्य म्हणाले, 'मिश्रजी, वादविवादाचा निर्णय आपल्या पत्नीमार्फत होईल.'

मंडनमिश्रांनीं शंकराचार्यांचें तेंहि म्हणणें कबूल केलें अन् ते त्यांना म्हणाले, 'आतां आपण आमच्या अतिथिगृहांत विश्रांति घ्या.'

शंकराचार्य द्वारपालासह अतिथिगृहाकडे निघून गेले.

✦ ✦

# दहा

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं वादविवादासाठीं एक सभामंडप सजविण्यांत आला. तो अद्भुत वादविवाद ऐकण्यासाठीं अनेक विद्वान लोक आले

सारे सभाजन आपापल्या आसनावर बसल्यानंतर शंकराचार्य मंडनमिश्रांना म्हणाले, 'भट्टपाद, आपली अर्धांगी सभापतीचें आसन अधिष्ठित करील असें आपण काल मला सांगितलें होतें; पण तें आसन अद्याप रिकामेंच आहे. तेव्हां भारतीला ताबडतोब बोलवा.'

पण तितक्यांत भारती आलीच.

दोन्ही पक्षांतील सभाजनांच्या अनुमतीनें ती अध्यक्षाच्या आसनावर अधिष्ठित झाली.

थोड्या वेळानें, तिनें त्या दोघांनाहि आपापले विचार सभेंत मांडण्याची आज्ञा केली.

त्यावर मंडनमिश्र म्हणाले, 'शंकराचार्य माझ्याशीं वाद-

विवाद करण्यासाठीं आले आहेत. त्यासाठीं त्यांनीं पूर्वपक्ष करावा, म्हणजे मी उत्तरपक्ष करीन.'

शंकराचार्यांनीं पूर्वपक्ष केला.

मंडनमिश्रांनीं त्याचें खंडन केलें !

शंकराचार्यांनीं दुसरा सिद्धांत मांडला.

मंडनमिश्रांनीं तोहि खोडून काढला !

अशा रीतीनें दोन्ही पक्षांकडून एकाहून एक कठीण असे प्रश्न मांडण्यांत येऊं लागले नि त्यांचीं उत्तरें देण्यांत येऊं लागलीं !

सभाजन या दोघांच्यांत चाललेला वादविवाद लक्षपूर्वक ऐकत होते. दोघेहि फार विद्वान होते, दोघांनाहि वेद, उपनिषदें इत्यादि प्राचीन ग्रंथांचें ज्ञान होतें नि त्यावरून कुणी कुणाला हरणार नाहीं असें सभाजनांस वाटत होतें.

अशा प्रकारें त्यांचा उच्च स्तरावरून वादविवाद होऊं लागला ! एक वेदांचें प्रामाण्य सिद्ध करी, तर दुसरा उपनिषदांचें महत्त्व पटवून देई !

वादविवाद होतां होतां जगन्नाथाची वेळ झाली ! पोटांत कावळे कोकलूं लागले !

दोघांपैकीं कुणीहि हार मानायला तयार नसल्याचें भारतीनें पाहिलें अन् ती म्हणाली, 'दोघेहि आपापले विचार प्रकट करा. मी दुरूनच ऐकेन. आतां दुपार झाली आहे. गृहिणीधर्माला अनुसरून मला स्वयंपाकाच्या तयारीला लागलें पाहिजे !'

असें म्हणून तिनें दोघांच्याहि गळ्यांत एकेक पुष्पहार घातला अन् ती त्यांना म्हणाली, 'ज्याच्या गळ्यांतला हार कोमेजून जाईल तो हरला असें समजायचें ! आपण आतां आनंदानें शास्त्रचर्चा करीत बसा !'

वादविवाद पुन्हां चालू झाला.

जीत–हाराचा पत्ता नव्हता ! दोन्ही पक्ष वादविवादांत रंगून गेले होते. दुसरा प्रहर उलटून तिसरा प्रहर चालू झाला होता; तथापि कुणाच्याहि गळचांतला पुष्पहार कोमेजला नव्हता !

अखेरीस भारतीनें वादविवाद थांबविण्याची आज्ञा केली.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं वादविवादाला पुन्हां सुरुवात झाली.

दोघांच्याहि गळ्यांत एकेक पुष्पमाला घालण्यांत आली. विचारविनिमय होऊं लागला. शंकराचार्य अद्भुत विचार मांडीत नि मंडनमिश्र त्यांचें खंडन करीत. त्यानंतर मंडनमिश्र दुसरा कोणता तरी सिद्धांत मांडीत; पण शंकराचार्य तो सिद्धांत चुकीचा असल्याचें सिद्ध करीत ! उभय पक्षांपैकीं कुणीहि आपल्यांत दुबळे-पणा नसल्याचें दाखवून देत असे !

अशा रीतीनें तो वादविवाद सतरा दिवसपर्यंत अखंडपणें चालला होता. रोज सुगंधी फुलांचे दोन हार आणले जात नि ते त्या दोघांच्या गळ्यांत घातले जात !

अठराव्या दिवशीं शंकराचार्य म्हणाले, 'कर्म केल्यानें माण-साला मुक्ति मिळत नसते. मुक्ति किंवा मोक्ष हें आत्म्याचें स्वरूप आहे. कर्म केल्यामुळें ज्यावेळीं माणसाला सुख किंवा दुःख प्राप्त होतें, त्यावेळीं आत्म्याला कांहींच कष्ट होत नाहींत; पण आपण कर्मावर विश्वास ठेवतां. कर्मांत ज्ञान नसतें, नि विनाज्ञान माणूस अमर होत नाहीं !'

मंडनमिश्रांना शंकराचार्यांचें विधान खोडून काढतां येईनासें झालें. ते फारच थकल्यासारखे दिसूं लागले. त्यांच्या अंगांतून घाम

निथळूं लागला. त्यांच्या गळ्यांतला पुष्पहार कोमेजून गेला ! तें सारें पहातांच भारती फारच व्याकुळ झाली; पण ती न्यायासनावर बसली होती !

आपला नवरा कांहींच बोलत नाहीं असें पाहिल्यावर तिनें निर्णय दिला– 'माझे यजमान वादविवादांत पराजित झाले आहेत...'

भारतीचा निर्णय ऐकतांच सारे सभाजन अवाक् झाले !

मंडनमिश्रांनीं शंकराचार्यांना प्रणाम केला नि ते त्यांना म्हणाले, 'गुरुदेव, मला आपला शिष्य करून घ्या. इतकेंच नव्हे तर संन्यासी बनण्याचा मला अधिकार असल्यास मला संन्यासदीक्षाहि द्या !'

त्यावर भारती म्हणाली, 'माझे यजमान अजून पूर्णपणें पराजित झालेले नाहींत. पत्नी ही पतीच्या अर्ध्या अंगाची अधिकारिणी असते असें शास्त्रांत सांगितलें आहे अन् म्हणूनच पत्नीला 'अर्धांगी' असें म्हणतात ! त्यासाठीं आपण जर वादविवादांत मला हरवलांत, तर माझ्या यजमानांस आपण खुशाल शिष्यत्वाची दीक्षा द्या ! आपण प्रकांडपंडित आहांत हें मला माहीत असूनहि मी आपल्याशीं वादविवाद करणार आहें !'

शंकराचार्यांपुढें आतां नवी समस्या उभी राहिली ! ते भारतीशीं वादविवाद करायला तयार नव्हते. थोडा वेळ विचार केल्यावर ते म्हणाले, 'देवि, पंडितजन स्त्रियांशीं वादविवाद करीत नसतात ! आपण मला क्षमा करा !'

त्यावर भारती म्हणाली, 'आपण स्त्रियांना कमी कां लेखतां बरें ? प्राचीन काळीं याज्ञवल्क्य ऋषींनीं गार्गी नांवाच्या

स्त्रीशीं वादविवाद केला होता. जनक राजानेंहि सुलभा नामक स्त्रीशी शास्त्रचर्चा केली होती; मग माझ्याशीं वादविवाद करायला हरकत कोणती ? जर आपली इच्छा नसेल, तर आपण पराजित झाल्याचें कबूल करा !'

भारतीचें तें पेचांत पाडणारें बोलणें ऐकल्यावर शंकराचार्य थोडा वेळ विचारमग्न झाले नि नंतर म्हणाले, 'मी तयार आहें !'

पूर्वीप्रमाणें भारती नि शंकराचार्य यांच्यांत वादविवाद सुरू झाला !

भारती किरकोळ गोष्टीला मोठें महत्त्व देऊं लागली !

तो वादविवाद सतरा दिवस चालला होता !

शंकराचार्यांना वादविवादांत हरविणें कठीण असल्याचें पहातांच भारती त्यांना प्रापंचिक प्रश्न विचारूं लागली !

शंकराचार्य म्हणाले, 'देवि, आपण शास्त्रांतले प्रश्न विचारा. मी त्यांचीं उत्तरें देईन. माझ्यासारख्या संन्याशाला असले प्रश्न कां विचारतां ?'

त्यावर भारती म्हणाली, 'सांसारिक गोष्टीहि शास्त्रांत लिहिल्या आहेत. आपण सारें कांहीं जाणतां, म्हणून लोक आपल्याला सर्वज्ञ समजतात; मग माझ्या प्रश्नांचीं उत्तरें आपल्याला कां देतां येणार नाहींत ?'

आपण पांचव्या वर्षीं संन्यास घेतला–आपण बालसंन्यासी आहों; सांसारिक गोष्टी आपल्याला माहीत नाहींत असें शंकराचार्यांनीं भारतीला परोपरीनें सांगितलें; पण ती त्यांचें सांगणें ऐकून घ्यायला मुळींच तयार झाली नाहीं !

अखेर शंकराचार्यांनीं तिच्याकडे एक महिन्याची मुदत मागितली !

भारती म्हणाली, 'मी आपल्याला एक महिन्याची मुदत देतें.'

अन् त्यानंतर सभा संपली !

# अकरा

महिष्मती नगर सोडून शंकराचार्य पूर्व दिशेकडे जात होते. त्यांच्यासोबत कांहीं शिष्यहि होते. रात्रंदिवस प्रवास करतां करतां ते एका घनदाट जंगलांत जाऊन पोहोंचले; पण तितक्यांत त्यांना कुणाचा तरी कोलाहल ऐकूं आला. ते पुढें गेले अन् पाहिलें, तेव्हां कुणीतरी एक राजा तिथें मरून पडला असल्याचें दिसलें. त्या राजाच्या राण्या नि बरेचसे पुरुष यांनीं राजाला वेढलें होतें अन् त्या घोळक्यांतलीं सारीं माणसें रडून आकांत करीत होतीं!

अधिक चौकशी केल्यावर तो राजा त्या जंगलांत शिकारीसाठीं आला असतां अकस्मात मेल्याचें त्यांना कळलें.

शंकराचार्यांना असीम आनंद झाला. आपला पट्टशिष्य सनंदन याला ते म्हणाले, 'सनंदन, याच्यापेक्षां दुसरी सुसंधी मला पुन्हां मिळणार नाहीं! मी या राजाच्या देहांत योगबलानें प्रवेश करणार आहें. तूं झटकन् एखादी निर्मनुष्य गुहा शोधून काढ.'

सनंदन नि इतर शिष्य आश्चर्यचकित झाले; तथापि

गुरूच्या आज्ञेनुसार ते कांहीं न बोलतां गुहेचा तपास करण्यासाठीं निघून गेले. त्या दाट जंगलांत तपास केल्यावर थोड्याच वेळांत त्यांना एक रिकामी गुहा सांपडली !

आचार्यांनीं ती गुहा पाहिली नि ते संतुष्ट झाले. ते म्हणाले, 'ही जागा सुरक्षित आहे. मी आतां योगबलानें त्या राजाच्या देहांत प्रवेश करतों. तुम्हीं या गुहेंत माझ्या अचेतन देहाचें महिना-भर रक्षण करा. महिन्यानंतर मी पुन्हां सचेतन होईन.'

असें म्हणून शंकराचार्यांनीं समाधि लावली. लगेच त्यांचा आत्मा त्या शरीरांतून नष्ट झाला नि मृत झालेल्या अमरक राजाच्या देहांत शिरला !



राजा राम राम म्हणत उठून उभा राहिला. त्याच्या राण्या खूष झाल्या !

राजा राण्यांसह आपल्या महालांत निघून गेला !

तथापि अमरक राजाच्या देहांत शंकराचार्यांच्या आत्म्यानें प्रवेश केला असल्याचें कुणालाच कळलें नव्हतें !

एक महिन्याच्या आंतच अमरक राजाच्या देहांतील आत्मा देहांतून निघून गेला, त्याबरोबर तो राजा पुन्हां गतप्राण झाला !

शंकराचार्यांचे शिष्य त्यांच्या देहाचें आस्थापूर्वक रक्षण करीत होते. त्यांचा देह पुन्हां सजीव झाल्याचें पाहिल्यावर ते सारे खूष झाले !

त्यानंतर शंकराचार्य मंडनमिश्रांच्या घरीं जाण्यासाठीं निघाले. ते ज्या दिवशीं त्यांच्या घरीं जाऊन पोहोंचले, तो दिवस महिनाअखेरीचा होता, म्हणून मंडनमिश्र त्यांची वाट पहात होते.

शंकराचार्यांनीं मंडनमिश्र नि भारती यांना प्रथम प्रणाम केल्यावर आपल्या बगलेंतून एक हस्तलिखित पोथी बाहेर काढली अन् ती पोथी भारतीच्या हातीं देतां देतां ते तिला म्हणाले, ‘ देवि, ही पोथी वाचण्याची तसदी घ्या. आपल्या साऱ्या प्रश्नांचीं उत्तरें हिच्यांत लिहिलीं आहेत. ’

भारतीनें त्या पोथीचीं पानें परतून पाहिल्यावर ती शंकराचार्यांना प्रसन्नतापूर्वक म्हणाली, ‘ यतिवर, आतां आपण विजयी ठरलांत. आतां माझे यजमान आपले शिष्य बनून संन्यासग्रहण करतील अन् नंतर मीहि निश्चिंत होऊन माझ्या स्थानीं निघून जाईन ! ’

त्यावर शंकराचार्य म्हणाले, ‘ देवि, आपण सरस्वतीचा अवतार असल्याचें मला माहीत आहे. अशा स्थितींत आपण संसार सोडून कुठेंतरी निघून गेलांत तर धर्माची मोठी हानि होईल. आपण आपल्या यजमानांसह या अवनीवर सुखानें संसार करा. आपले यजमान नि आपण यांनीं मला गुरु मानलें आहे, ही माझ्या

बाबतींत मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे. आतां आपल्या यजमानांना संन्यास घेण्याचें कांहींच कारण नाहीं !'

मंडनमिश्र नि भारती हीं दोघेंहि स्वतःला धन्य समजलीं !

त्यानंतर मंडनमिश्रांनीं आचार्यांना आदराभिवादन केलें अन् ते त्यांना म्हणाले, 'गुरुदेव, माझ्या चुकीबद्दल मला माफ करा. आपला मोठेपणा समजून घेण्यासाठींच मी आपल्याशीं वाद-विवाद करण्यास प्रवृत्त झालों होतों. माझ्या पूर्वपुण्याईमुळें आतां माझ्या जन्माचें सार्थक झालें ! आपण जगद्गुरु आहांत !'

शंकराचार्यांनीं त्या दोघांनाहि आशीर्वाद दिल्यावर ते आपल्या पुढील कार्यासाठीं तिथून निघून गेले.

✦ ✦

# बारा

आतां शंकराचार्यांच्या वयाला सोळा वर्षें पुरीं झालीं होतीं.

मंडनमिश्रांना वादविवादांत पराजित केल्यावर शंकराचार्यांच्या जीवनांत एक नवा प्रकाश दिसूं लागला. आतां ते आदिकालापासून चालत आलेल्या हिंदु धर्माच्या प्रचाराची योजना आंखूं लागले.

त्यांच्या शिष्यांनींहि त्यांना सांगितलें, 'भगवन्, धर्माचें सत्य स्वरूप आज कुणालाहि कळेनासें झालें आहे. आपण आतां चारहि दिशांना हिंडून लोकांना धर्मकर्माच्या गोष्टी समजावून दिल्या पाहिजेत.'

शंकराचार्यांना त्यांचें म्हणणें पटलें. ते धर्मप्रसार करण्यासाठीं त्यांच्याबरोबर निघाले.

पहिल्याप्रथम ते नासिक क्षेत्रांत आले. तिथें आल्यावर त्यांनीं पंचवटीचें दर्शन घेतलें.

पंचवटींतलें पावित्र्य पाहिल्यावर शंकराचार्यांनीं तिथें एक

मठ स्थापन केला.

त्या मठांत कांहीं दिवस राहून त्यांनीं धर्मप्रचार केला. बरेचसे लोक हिंदु धर्माविषयीं विश्वास दाखवूं लागले. छली, कपटी, लंपट, शैव, वैष्णव, शाक्त, कापालिक इत्यादि लोकांनीं त्यांचें शिष्यत्व पत्करलें.

अशा प्रकारें कांहीं दिवस निघून गेले.

एके दिवशीं शंकराचार्य मठाजवळच्या जंगलांत समाधि लावून बसले असतां एक कापालिक तिथें आला नि त्यांच्यासमोर बसला. जेव्हां शंकराचार्यांची समाधि उतरली, तेव्हां समोर बसलेला कापालिक त्यांना दिसला.

ते त्याला म्हणाले, 'कापालिका, काय काम आहे माझ्याकडे तुझें? तुझी इच्छा पुरविण्याचा मी अवश्य प्रयत्न करीन.'

कापालिक रडत रडत त्यांना म्हणाला, 'देवा, मी आयुष्यभर श्रीशंकराची तपःसाधना केली आहे. कैलासपति शंकरानें प्रसन्न होऊन मला वर दिला आहे कीं, जेव्हां माझ्या पिंडीवर एखाद्या राजाचा किंवा सर्वज्ञ संन्याशाचा शिरच्छेद करून त्याचें शिर मला अर्पण करशील, तेव्हां मी तुझी इच्छा पुरी करीन. आपण सर्वज्ञ आणि दयाळु आहांत. जगाचें कल्याण करणें हा आपला धर्म आहे. आपण आपलें मुंडकें मला द्या, नाहींपेक्षां मला मरावें लागेल!'

त्यावर शंकराचार्य त्याला म्हणाले, 'माझें मुंडकें शंकराला अर्पण केलेंस, तरी तो तुझ्यावर प्रसन्न होणार नाहीं. तुला तसें वाटत असल्यास तो तुझा भ्रम आहे असें मी समजेन.'

कापालिक रडत रडत म्हणाला, 'प्रभो, आपण सारें कांहीं जाणतां. माझें आतां उतारवय झालें असलें, तरीहि आणखीन्

कांहीं काल जगावें असें मला वाटतें. जर भगवान् शंकराच्या आज्ञेचें माझ्याकडून पालन झालें, तर मी धन्य झालों असें समजेन. ज्याप्रमाणें दधिचि मुनींनीं इंद्राला आपल्या अस्थि देऊन यश मिळविलें होतें, त्याप्रमाणें आपण आपलें मुंडकें देऊन मला धन्य करा!'

कापालिकाची ती छलभरित प्रार्थना ऐकल्यावर शंकराचार्यांचें अंतःकरण विरघळलें! त्यांनीं मनांत विचार केला, 'हें शरीर म्हणजे काय? केव्हांतरी एक दिवस नष्ट होणार, मग या शरीरापासून जर कुणाचें कल्याण होत असेल, तर ती गोष्ट चांगली आहे असें म्हणावें लागेल.'

शंकराचार्यांनीं थोडा वेळ विचार केला अन् ते त्या कापालिकाला म्हणाले, 'मी माझें मुंडकें तोडून द्यायला तयार आहें; पण ही गोष्ट जर माझ्या शिष्यांना समजली, तर तुझी इच्छा पुरी व्हायची नाहीं!'

कापालिक म्हणाला, 'त्याची आपण काडीमात्र काळजी करूं नका! याच जंगलांत थोडक्या दूरवर एक शिवमंदिर आहे. तिथें मध्यरात्रसमयीं सारें काम निकालांत निघेल. आपण उत्तर दिशेकडे चालत या. मी वाटेंत आपल्याला भेटेन नि शिवमंदिरांत घेऊन जाईन. त्यामुळें कुणाला कांहीं कळणार नाहीं!'

शंकराचार्य त्या जंगलांतून उत्तर दिशेकडे चालत जाऊं लागले.

बोलल्याप्रमाणें तो कापालिक त्यांना वाटेंत भेटला. त्यानें त्यांना आपल्याबरोबर शिवमंदिरापाशीं नेलें.

तिथें जाऊन पोहोंचल्यावर शंकराचार्यांनीं पाहिलें-एक अग्निकुंड धगधगत होतें. त्या अग्निकुंडाशेजारीं पूजेचें सारें साहित्य

ठेवलें होतें अन् एक काळाकुट्ट कापालिक हातांत त्रिशूळ घेऊन त्या जागेचें रक्षण करीत होता !

कापालिक शंकराचार्यांना म्हणाला, ' प्रभो, शुभघटि समीप आली आहे. आपण या बलिदानाच्या शिळेवर आपलें डोकें ठेवा. मी आपलें शिर तोडून यज्ञ पुरा करतों !'



त्यावर शंकराचार्य म्हणाले, 'तुला थोडा वेळ थांबावें लागेल. तोंवर मी समाधि लावतों नि ती लावल्यावर तूं आपलें काम पुरें कर !'

तो कापालिक कांहीं वेळ वाट पहात बसला. त्यावेळीं शंकराचार्य ईश्वरध्यानांत मग्न झाले होते.

पण कांहीं वेळानें त्या अग्निकुंडापाशीं एक मोठा आवाज झाला अन् त्या कापालिकाचें शिर तुटून तें जमिनीवर पडलें !

पहारा करीत असलेल्या कापालिकाचेहि दोन तुकडे झाले!

त्या आवाजामुळें शंकराचार्यांचा समाधिभंग झाला !

त्यांनीं डोळे उघडून पाहिलें, तेव्हां सनंदन आपल्या साथीदारांसह समोर उभा असून त्याच्या एका हातांत तलवार नि दुसऱ्या हातांत त्या कापालिकाचें शिर असल्याचें त्यांना दिसलें !

शंकराचार्यांनीं सनंदनाला विचारलें, 'सनंदन, हा सारा काय प्रकार आहे ?'

सनंदन म्हणाला, 'प्रभो, मी माझ्या साथीदारांसह मठांत झोंपलों होतों, इतक्यांत निर्मनुष्य जंगलांत एक कापालिक आपलें मुंडकें मारायला तयार झाला आहे असें अचानक स्वप्न पडलें मला. मी लगेच माझ्या साथीदारांना जागें केलें नि त्यांच्यासह इथें आलों. त्यानंतर काय घडलें तें आपल्याला ठाऊकच आहे !

शंकराचार्यांनीं सनंदनाला आपल्या छातीशीं धरलें ! त्या कापालिकाला योग्यवेळीं शासन होण्यासाठीं आपणच तें स्वप्न सनंदनाला पाडलें होतें, ही गोष्ट ते विसरले !

सनंदनाची गुरुभक्ति पाहून इतर शिष्य त्याला म्हणाले 'सनंदन, तूं धन्य आहेस ! तुझ्या प्रतापामुळेंच गुरुदेव आज आम्हांला जिवंत दिसले !'

त्यानंतर शंकराचार्य म्हणाले, 'शिष्यांनो, संन्यास दोन प्रकारचा असतो. एक ज्ञानप्राप्तीसाठीं नि दुसरा साहसकर्मासाठीं. सनंदनानें साहसकर्म करून संन्यासाचें रहस्य उघड केलें आहे. आतां आपण कांहीं काळ इथेंच वास्तव्य करूं नि योग्य वेळ येतांच धर्मप्रचारासाठीं दुसरीकडे जाऊं.'

# तेरा

महिष्मतींत दोन वर्षें वास्तव्य केल्यावर शंकराचार्य शारदापीठ नांवाच्या तीर्थस्थानीं गेले. तिथें त्यांनीं 'मूकदेवी' चें प्रसिद्ध मंदिर पाहिलें.

साऱ्या संन्याशांना जिंकणाऱ्या शंकराचार्यांचें आगमन झाल्याचें ऐकतांच तिथल्या पंडितांत गडबड सुरू झाली! त्यांच्याशीं वादविवाद करण्यासाठीं बरेचसे पंडित तिथें जमा झाले; परंतु शंकराचार्यांनीं मंडनमिश्र नि कुमारिलभट्ट यांच्या-सारख्यांना जिथें वादविवादांत हरविलें होतें, त्या दोघां पंडितांच्या मानानें तिथें जमलेले पंडित हे कांहींच नव्हते! बरेच पंडित पराजित होऊन निघून गेले; तथापि शेवटचा एक पंडित मात्र हट्टी होता!

तो शंकराचार्यांना म्हणाला, 'माझी एक परीक्षा अजून शिल्लक आहे. आपण त्या परीक्षेंत पास होईपर्यंत मी आपल्याला आचार्यांच्या आसनावर बसूं देणार नाहीं!'

त्या हट्टी पंडिताचें बोलणें ऐकल्यावर तिथें उरलेले कांहीं पंडित खूष झाले ! आतां शंकराचार्यांना पराजित व्हावें लागणार असें त्यांना वाटत होतें ! केवळ दुस्वास्सामुळें त्यांच्या मनांत तसा विचार घोळत होता !

शंकराचार्यांनीं सर्वांना शांत केलें. ते त्यांना म्हणाले, 'आपण गडबड करूं नका. या महाशयांना उत्तर द्यायला मी तयार आहें !'

शंकराचार्यांनीं आपल्याला उद्देशून इशारा केला आहे असें त्या हट्टी पंडिताला वाटल्यामुळें तो पंडितांना म्हणाला, 'या सभास्थानाच्या परिसरांत मी एक खिळा ठोकून ठेवला आहे. माझ्या हातांतलें हें कंकण आचार्यांनीं अशा रीतीनें फेकून दाखवावें कीं, तें जमिनीवर पडल्यानंतर त्या कंकणाच्या मध्यभागीं मी जमिनींत ठोकलेला खिळा असला पाहिजे !'

असें म्हणून त्यानें तें कंकण शंकराचार्यांच्या हातांत दिलें !

त्या पंडिताची परीक्षेची पद्धत अजब होती ! तो कांहीं शास्त्रांतला प्रश्न नव्हे असें त्या पंडितांना वाटलें; पण ते कांहींसुद्धां बोलले नाहींत !

शंकराचार्यांनीं त्या पाखंडी पंडिताचा कुटिल कावा ओळखला ! ते म्हणाले, 'महाशय, आपली इच्छा पूर्ण होईल !'

तें कंकण हातांत घेऊन शंकराचार्यांनीं आपले डोळे झांकले नि समाधि लावली.

थोड्या वेळानें तें कंकण त्यांनीं वर फेकून दिलें, तें कंकण जिथें पडलें, तिथें लोकांनीं जाऊन पाहिलें, तेव्हां त्या कंकणाच्या मधोमध जमिनींत खिळा ठोकला असल्याचें त्यांना दिसून आलें !

आचार्यांची ती अद्भुत शक्ति पाहून लोक त्यांच्यापुढें नतमस्तक झाले !

पंडितांनीं शंकराचार्यांना शारदापीठाचे आचार्य म्हणून मान्यता दिली. शंकराचार्यांनीं कांहीं काळ शारदापीठांत उपदेश-कार्य केल्यानंतर ते शृंगेरीधामाकडे निघून गेले.

तिकडे जात असतां त्यांनीं वाटेंत लोकांना धर्मोपदेश केला.

ते एकटेच जात नव्हते. हजारों लोक त्यांच्यासोबत होते.

रात्रंदिवस प्रवास केल्यावर शंकराचार्यांनीं शृंगेरींत पदार्पण केलें. जगद्गुरु शंकराचार्यांच्या आगमनाची वार्ता ऐकतांच तेथील राजा कांहीं सेवकांसह त्यांच्या स्वागतासाठीं आला.

शंकराचार्य प्रसन्न झाले अन् त्यांनीं राजाला एक मठ नि एक मंदिर बांधण्यास सांगितलें.


राजानें त्याच दिवसापासून मठ बांधण्यास सुरुवात केली. थोड्याच दिवसांत मठ नि मंदिर हीं बांधून तयार झालीं. शंकराचार्यांनीं स्वतःच्या हस्तें मंदिरांत देवमूर्तीची स्थापना केली अन् मठांत राहून ते लोकांना धर्मोपदेश करूं लागले.

एके दिवशीं प्रातःकाळीं शंकराचार्य आपल्या शिष्यांना शास्त्रार्थ समजावून सांगत होते, इतक्यांत त्यांच्या तोंडांत दुधाची धार येऊन पडली !

शंकराचार्य तावडतोब उठून उभे राहिले अन् शिष्यांना म्हणाले, 'माझ्या मातेचा अंतकाळ जवळ आला आहे असें मला वाटतें. ती माझी वाट पहात असल्यामुळें मी आतां तिला भेटण्यासाठीं जातों !'

असें म्हणून ते योगबलानें आकाशांतून उडत केरळांतील आपल्या आईपाशीं जाऊन पोहोंचले.

त्यांची आई मृत्युशय्येवर पडली होती. तिच्याजवळ एक म्हातारी मोलकरीण बसली होती.



आईची अवस्था पाहिल्यावर शंकराचार्यांचे डोळे अश्रूंनीं भरून आले ! ते आपल्या आईला म्हणाले, ' आई, मी तुझ्या सेवेसाठीं आलों आहें. तुला कसला त्रास होत आहे तें सांग, म्हणजे औषध देऊन मी तुला बरी करतों. '

त्यावर विशिष्टा म्हणाली, ' बाळा, तुझें चांगलें चाललें असल्याचें पाहून मला आनंद झाला आहे. आतां ही माझ्या अंत-काळाची वेळ आहे. आतां जर मी तुझ्यासमोर देहत्याग केला, तर माझ्या आत्म्याला शांति मिळेल ! या म्हातारीनें माझी फार मोठी सेवा केली असल्यानें तूं हिला विसरूं नकोस ! '

बोलतां बोलतां विशिष्टेची जीभ अडखळूं लागली ! त्यानंतर थोड्याच वेळांत तिचें प्राणोत्क्रमण झालें !

शंकराचार्यांना झालेलें दुःख त्यांनीं आंतल्या आंत गिळून टाकलें !

त्यानंतर त्यांनीं घरापुढच्या अंगणांत चिता रचिली अन् आपल्या आईचें शव स्वतां उचलून तें चितेवर नेऊन ठेवलें ! नंतर त्यांनीं शेजारच्या घरांतून विस्तव मागून घेतला अन् चिता पेटविल्यावर आपल्या आईचा दाहसंस्कार पुरा केला !

ते बारातेरा दिवस केरळांत राहिले नि नंतर ती तीर्थ-यात्रेला निघून गेले.

वाटेंत त्यांना त्यांचे शिष्यहि भेटले.

मगध, पाटणा, इत्यादि नगरांतून धर्मोपदेश करतां करतां ते गौड प्रदेशांत जाऊन पोहोंचले.

तिथें गंगातीरीं त्यांचे गुरु पतंजलि हे त्यांना भेटले.

गुरुचरणांना स्पर्श केल्यावर शंकराचार्य त्यांच्या सेवेंत गढून गेले !

वाढत्या वार्धक्यामुळें पतंजलि बरेच थकून गेले होते. शंकराचार्यांच्या सेवेमुळें संतुष्ट होऊन ते त्यांना म्हणाले, ' बेटा शंकर, तूं जागोजागीं धर्मोपदेश करून लोकांचें कल्याण केलें आहेस. आतां तूं चारी दिशांना जाऊन चार धाम नि चार मठ यांची स्थापना कर, म्हणजे त्यामुळें हिंदु धर्म चिरकाल जिवंत राहील ! '

शंकराचार्यांनीं पतंजलींच्या पायावर आपलें डोकें ठेविलें नि

ते त्यांना म्हणाले, ' आपली आज्ञा प्रणाम महाप्रभु ! '

त्यानंतर पतंजलि लगेच अंतर्धान पावले !

शंकराचार्यांनीं आपल्या चार प्रमुख शिष्यांना जवळ बोलाविलें अन् त्यांना सांगितलें, ' गुरुदेवांच्या आज्ञेनुसार आपण आतां भारताची चार भागांत वांटणी करूंया नि प्रत्येक भागांत धर्मप्रचाराचें कार्य करूं या. '

सनंदन, सुरेश्वर, हस्तामलक नि तोटक असे शंकराचार्यांचे चौघे प्रमुख शिष्य धर्मप्रचाराचें कार्य करण्यासाठीं त्यांच्याबरोबर निघून गेले.

शंकराचार्यांनीं दोन वर्षांच्या अवधींत चार धाम नि चार मठ यांची स्थापना केली. द्वारका धामांत शारदा मठ स्थापन केला, पुरी धामांत गोवर्धन मठ स्थापन केला, रामेश्वर धामांत ज्योतिर्मठ स्थापन केला अन् ज्योतिर्धामांत शृंगेरी मठ स्थापन केला. ते चार मठ चौघां शिष्यांच्या स्वाधीन केल्यावर ते त्यांना म्हणाले, ' ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद नि अथर्वण वेद असे चार वेद असल्यामुळें मीं चार मठ स्थापन केले आहेत. आतां तुम्ही नियमसंयमानें धर्मप्रचाराचें कार्य चालूं ठेवा. माझें दैहिक कार्य आतां पुरें झालें आहे. मी आतां देवाच्या भेटीला जाणार आहें. तुम्हांला कांहीं विचारायचें असेल तर तें यावेळीं मला विचारा. '

शंकराचार्यांचें तें बोलणें ऐकतांच चारहि शिष्य अवाक् झाले ! त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडेनासा झाला !

त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या !

शंकराचार्यांनीं समाधि लावली नि थोड्याच वेळांत त्यांचा अमर आत्मा अनंतांत विलीन झाला !

बाराशें वर्षांनंतर आपण आजहि त्या मठांकडे पाहिलें असतां सत्य हा प्रकाश असून असत्य हा अंधःकार आहे असें आपल्याला वाटतें !

# समाप्त

म. ग्रं. सं. ठाणे,
वा. क्र. ११९८
विषय ६१५
BVBK-0401118